हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

६०

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष १० वे : अंक १२
मार्च २०२५

# मासिक नवस्नेह

स्थापना : १९६४

स्वागतमूल्य
₹. 30/-



"अजर अमर हे गगन कन्यके
अग्नीचे तनू धारण तू
तू शक्तीचे परम शिवालय
रूपरक्षाचे कारण तू..."

\- कुसुमाग्रज

प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# प्रख्यात ज्येष्ठ मेंदूतज्ज्ञ डॉ. एन. वाय. जोशी यांना 'जीवनगौरव पुरस्कार'




प्रख्यात मेंदूतज्ञ डॉ.एन.वाय.जोशी यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करताना
परमपूज्य काडसिद्धेश्वर स्वामीजी, डॉ. मिलिंद दुनाखे, डॉ. श्रीनिवास रोहिदास आणि डॉ. शिवशंकर मरजक्के

महाराष्ट्र राज्य एमसीएनएस (मिड वेस्ट चाप्टर ऑफ न्यूरॉलॉजिकल सर्जन) या न्यूरो सर्जनच्या १५ व्या राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय परिषदेचे उद्घाटन नुकतेच कणेरीमठाचे परमपूज्य श्री काडसिद्धेश्वर स्वामीजी यांच्या हस्ते कोल्हापूर येथे झाले. न्यूरो सर्जनच्या क्षेत्रातील भीष्म पितामह म्हणून ओळखले जाणारे, सत्तरच्या दशकापासून अविरतपणे रुग्णसेवा करणारे आणि न्यूरो सर्जरीच्या क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान कोल्हापुरात आणणारे प्रख्यात मेंदूतज्ञ डॉ.एन.वाय.जोशी यांना या परिषदेत जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.

'शरीर आणि त्या शरीराच्या प्रत्येक अवयवाचे विशेष तज्ञ यामध्ये मेंदू तज्ञांचे कार्य अतुलनीय आहे. तुम्ही लोकांचे आयुष्य वाढवता, म्हणजे तुम्ही दुसरे देव आहात. देवाने आपल्याला बनवले. पण आपल्या शरीरामध्ये जर काही बिघाड झाला तर त्याची दुरुस्ती म्हणजेच उपचार तुम्ही करता. ठीक झालेल्या शरीराचा उपयोग कसा करायचा आणि अंतरिक शक्तीवर आधारित विविध आध्यात्मिक प्रयोग हे आम्ही करतो. पुरातन काळात यावर ज्ञान दिले जायचे. आज नवीन आधुनिक तंत्रज्ञान आलेले आहे. यामध्ये मनाची एकाग्रता अतिशय महत्त्वाची आहे.' असे प्रतिपादन परमपूज्य काडसिद्धेश्वर स्वामीजी यांनी यावेळी केले.

'लोकांनी तुम्हाला देवाचे स्थान दिले आहे. जास्तीत जास्त रुग्णसेवा करण्यासाठी प्रत्येकाने सतत विद्यार्थी बनून शिकले पाहिजे.' अशी अपेक्षा यावेळी परमपूज्य काडसिद्धेश्वर स्वामीजी यांनी व्यक्त केली.

# १०८ सूर्यनमस्कार कार्यक्रमाचे आयोजन





कोल्हापूर चित्पावन संघ आणि योगविद्याधाम नाशिक यांचेतर्फे मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी रथसप्तमी निमित्त रंकाळा पदपथ उद्यान, अंबाई टँकजवळ, कोल्हापूर येथे सकाळी ६ ते ७ या वेळेत १०८ सूर्यनमस्कार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. योगशिक्षिका सौ. सिद्धी बकरे आणि श्री. रोहित गवळी सर यांच्या मार्गदर्शनाखाली १७ योगसाधकांनी याचा लाभ घेतला. सौ. बकरे मॅडम कोल्हापूर चित्पावन कार्यालयात रोज सकाळी योगवर्ग घेतात.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष १० वे : अंक १२ : मार्च २०२५**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984

### अनुक्रम

१) **संपादकीय /४**

२) **महाकुंभातील आखाडे आणि धर्मरक्षण /५**

३) **शिशीर /९** - वैदेही जोशी

४) **सोपानदेवांची अलौकिक सोपानदेवी /११**
- सौ. मंजुश्री गोखले

५) **मुलांचे पान /१२**

६) **ज्ञानसूर्याची सावली /१४**
- सौ. मंजुश्री गोखले

७) **ब्राह्मण आणि सरकारी अनुदान /१६**
- श्रीकांत शिंत्रे

८) **तासगावचा पठ्ठ्या आबासाहेब गरवारे /१८**

९) **मेहेंदळे गुरुजींचे हरिहर विद्यालय /२०**
- डॉ. विकास मेहेंदळे

१०) **वधूवर माहिती यादी /२५**

- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे, विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०



हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**


श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611

**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**

या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. १७ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

उकाडा सुरू झाला आणि त्यात परीक्षांचा महिना. कशी सुटका व्हायची या टेन्शनधून? उत्तर सोपं आहे, नवस्नेह वाचून ! कारण नवनवीन विषयांवरील उत्तमोत्तम लिखाणांनी नटलेला आपला नवस्नेह म्हणजे रिलीफच तर आहे ! या महिन्याच्या नवस्नेहच्या अंकात दोन प्रेरणादायी लेख आहेत. एक म्हणजे आपल्याला कोणाला फारशी ज्ञात नसलेली किंवा अगदी थोड्या लोकांना माहित असलेली आबासाहेब गरवारे यांची कष्टमय यशोगाथा आणि कोल्हापुरातील पहिली आदर्श शाळा हरिहर विद्यालय, या शाळेची आणि शाळेचे संस्थापक असलेल्या मेहंदळे गुरुजींची कथा असे दोन प्रेरणादायी लेख या अंकात आहेत. तसेच सध्या सर्वत्र बोलबाला असलेल्या प्रायागराजच्या कुंभमेळ्याची महतीही या अंकात आपण वाचणार आहोत. शिवाय नेहमीची सदरे आहेतच !

मित्रांनो, या कुंभमेळ्यानं इतिहास रचला. तर उत्तेकरांच्या छावा चित्रपटानं खराखुरा घडलेला इतिहास दाखवला. अशाच घटनांमधून आत्तापर्यंत लपवलेला किंवा जातीभेदाचा, विशेषत: ब्राह्मण द्वेषाचा मुलामा दिलेला खोटा इतिहास बदलला जाईल. त्या घटनांचं आपण स्वागत केलं पाहिजे. अर्थात हे करत असताना जाणून बुजून कुणाचं मन दुखावलं जाणार नाही, याची मात्र खबरदारी घेतली पाहिजे आणि एकात्मतेला धक्काही नाही लागला पाहिजे. आकम्रक असावं पण हिंसक नसावं. कारण

**जीभेला झालेली जखम**
**कालांतराने भरून येते**
**पण जीभेमुळे झालेली जखम**
**आयुष्यभर तशीच राहते !**

म्हणून जीभेवर ताबा हवा. सर्वच दृष्टीनं! खाण्याच्या आणि बोलण्याच्या सुद्धा ! कारण

**इन्सान का वजन हर बार**
**तोलने से नहीं**
**कई बार बोलने से भी**
**पता चल जाता है ।**

'वजन' हा ही शब्द इथं दोन अर्थानं आहे बरं का ! आता दहावी, बारावीच्या परीक्षा आहेत म्हटल्यावर पालकांचं विशेषत: आयाचं वजन कमी झालं असेल. पण घाबरू नका. महिनाभरात आंबा येतोय ! त्यामुळं वजन पूर्ववत व्हायला वेळ लागणार नाही ! असो.

उन्हाळा आणि उन्हामुळं उकाडा वाढतोय. सध्या पडत असलेलं ऊन घातक आहे. तेव्हा सांभाळून रहा. आपली स्वत:ची, घरातल्या वृद्धांची आणि मुला-बाळांची काळजी घ्या. ते ग्लोबल वॉर्मिंग का काय म्हणतात, ते माहीत नाही. पण ग्लोबल बर्निंग सध्या असणार आहे, अजून ३-४ महिने तरी ! तेव्हा प्रकृतीला जपा आणि नवस्नेह वाचून उत्साही व्हा !

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**
**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# महाकुंभातील आखाडे आणि धर्मरक्षण

प्रयागराज, उत्तर प्रदेशमध्ये मोठ्या प्रमाणावर महाकुंभ आयोजित केला जात आहे. महाकुंभात स्नान केल्याने मनुष्याला सर्व पापांपासून मुक्ती मिळते आणि मोक्ष प्राप्त होतो, अशी धार्मिक श्रद्धा आहे. या कुंभमेळ्यात भारतभरातून लाखो भाविक, साधुसंत शाही स्नानासाठी सामील होतात. या शाही स्नानाला विशेष महत्त्व असते. कुंभमेळ्यातील शाही स्नानात वेगवेगळ्या आखाड्यातील साधूसंतांना अग्रक्रम दिला जातो हे आपण ऐकले असेलच. आता हे आखाडे काय, कोणते? असे प्रश्न आपल्यापैकी बऱ्याच जणांना पडत असतील. त्यासाठीच हा लेखप्रपंच.

'आखाडा' हा शब्द ऐकल्यावर कुस्ती हा शब्द मनात येतो, पण इथे अर्थ या शब्दाच्या उत्पत्तीशी संबंधित आहे. 'आखाडा' हा शब्द संस्कृतमधील 'अखंड' या शब्दावरून आला आहे, ज्याचा अर्थ आहे अविभाज्य, अखंडित, किंवा सतत टिकणारा. याचा उपयोग प्राचीन काळापासून संत, तपस्वी, आणि साधूंनी स्थापन केलेल्या संघटनांसाठी केला जातो.

ज्या संतांना शस्त्रास्त्रांचे अधिक ज्ञान होते त्यांच्यासाठी आदि शंकराचार्यांनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी अनेक संघटना निर्माण केल्या. या संघटनांना आखाडा म्हणून ओळखले जात असे. आखाड्यांचा इतिहास फार जुना असल्याचे सांगितले जाते.

आखाडे हे समाजव्यवस्था, एकात्मता, संस्कृती आणि आचार यांचे प्रतीक आहेत. समाजात आध्यात्मिक मूल्यांची स्थापना करणे हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. समाजात नैतिक मूल्ये रुजवणे ही आखाडा मठांची सर्वात मोठी जबाबदारी आहे. या कारणास्तव, धर्मगुरूंच्या निवड प्रक्रियेदरम्यान सद्गुण, नैतिकता, आत्मसंयम, करुणा, कठोरता, दूरदृष्टी आणि धार्मिकता यावर विशेष भर दिला जातो. भारतीय संस्कृती आणि एकात्मता जोपासणाऱ्या या आखाड्यांतून सामर्थ्य प्राप्त होते. विविध संघटनांमध्ये विभागलेले असूनही, आखाडे विविधतेतील एकतेचे प्रतीक आहेत.

**आखाड्यांची संघटनात्मक रचना**

धार्मिक कार्यांना चालना देण्याबरोबरच हिंदू धर्म आणि त्याच्या अनुयायांचे रक्षण करणे हा या आखाड्यांचा उद्देश होता. कालांतराने आज या आखाड्यांची संख्या १३ वर पोहोचली आहे.

या १३ आखाड्यांपैकी ७ मुख्य आखाड्यांची स्थापना आद्य शंकराचार्यांनी केली असं मानतात. हे सात आखाडे म्हणजे महानिर्वाणी, निरंजनी, जुना, अटल, अवाहन, अग्नी आणि आनंद आखाडा. या सर्व आखाड्यांना ४ श्रेणीत विभाजित करण्यात आलं आहे.

आखाडे विविध पंथांमध्ये आयोजित केले जातात, प्रामुख्याने त्यांच्या तात्विक अभिमुखतेवर आणि ते ज्या देवतेची पूजा करतात त्यावर आधारित वर्गीकरण केले जाते. भगवान शिवाला समर्पित असलेले शैव आखाडे आणि भगवान विष्णूला समर्पित वैष्णव आखाडे हे दोन मुख्य पंथ आहेत. प्रत्येक आखाडा एका पदानुक्रमानुसार चालतो, विशेषत: महंत (मुख्य) किंवा आचार्य (आध्यात्मिक नेता) यांच्या नेतृत्वाखाली जो आध्यात्मिक आणि प्रशासकीय कार्यांवर देखरेख करतो.

**किती आखाडे आहेत?**

वर सांगितल्याप्रमाणे १३ आखाड्यांमध्ये ७ शैव, ३ वैष्णव आणि ३ उदासीन (सिक्ख) अखाडे अशी रचना आहे.

**७ शैव आखाड्यांमध्ये :** १. जुना आखाडा, २. निरंजनी आखाडा, ३. महानिर्वाणी आखाडा, ४. आवाहन आखाडा, ५. अटल आखाडा, ६. आनंद आखाडा, ७. पंचाग्नि आखाडा.

आदि शंकराचार्यांनी शैव संप्रदायातील संयुक्त संन्यासी लोकांचे १० गटात वर्गीकरण केले. १. गिरी

२. पुरी ३. भारती ४. तीर्थ ५. बंदी ६. अरण्य ७. पर्वत ८. आश्रम ९. सागर १०. सरस्वती

यातील जुना आखाड्यामध्ये किन्नर आखाड्याचा समावेश होतो.

**तर ३ वैष्णव आखाड्यांमध्ये :** १) दिगंबर आखाडा, २) निर्वाणी आखाडा, ३) निर्मोही आखाडा यांचा समावेश आहे.

**३ उदासीन (सिक्ख) आखाड्यांमध्ये :** १) निर्मोही आखाडा, २) मोठा उदासीन आखाडा, ३) नवीन उदासीन आखाडा यांचा समावेश आहे.

यातील प्रत्येक आखाड्याची आपली स्वतःची वेगळी व्यवस्था असते. आदि शंकराचार्य यांनी यातील १० (७ शैव आणि ३ उदासीन) आखाड्यांची व्यवस्था चार शंकराचार्य पीठांच्या अधीन करून ठेवली आहे. तर या आखाड्यांची सूत्रे शंकराचार्यांजवळ असतात. आखाड्यांच्या व्यवस्थेसाठी कमिटीच्या निवडणुका होतात.

**जुना आखाडा**

जुना आखाड्याच्या विशालतेबद्दल सांगायचे तर असे म्हटले जाते की सुमारे १३ आखाड्यांपैकी जुना आखाडा सर्वात मोठा आहे. ज्याचा इतिहास चौथ्या शतकापासून आहे. हे महान ऋषी कपिल मुनी यांनी स्थापित केले होते.

आखाड्याचे केंद्र वाराणसीतील हनुमान घाटावर आहे. सध्या त्यांचा आश्रम हरिद्वारच्या मायादेवी मंदिराजवळ आहे. या आखाड्यातील भिक्षूची संख्या चार लाखांहून अधिक आहे. त्यापैकी बहुतेक नागा साधू आहेत. नागा साधू सहसा नग्न किंवा कमीत कमी कपडे घातलेले दिसतात, त्यांच्या शरीरावर राख आहे, त्याग आणि अध्यात्माला समर्पित जीवनाचे प्रतीक आहे. ते त्रिशूळ, तलवारी आणि भाले यांसारखी शस्त्रे बाळगतात, ज्यामुळे त्यांचा युद्धाचा वारसा दिसून येतो. त्यांची कठोर तपश्चर्या आणि शारीरिक सहनशक्ती पौराणिक आहे, त्यांच्या संदर्भात विस्मय आणि आदर दोन्ही आकर्षित करते. धर्म अबाधित ठेवण्याकरीता नागा साधूना धर्मग्रंथ तसेच शस्त्रे शिकवून युद्धकौशल्यां-मध्ये पारंगत करण्यात आल्याचे म्हटले जाते. शंकराचार्यांच्या मार्गदर्शना-खाली स्थापन झालेल्या या आखाड्यांनी पुढे इस्लामिक आक्रमकांचाही सामना केला.

**मंदिरे आणि मठांच्या रक्षणासाठी मुघलांशी लढा**

अफगाण आक्रमक अहमद शाह अब्दाली मथुरा-वृंदावन लुटल्यानंतर तो गोकुळ लुटण्याच्या इराद्याने पुढे सरकला, पण नागांनी त्याला रोखले. त्यामुळे गोकुळ लुटण्याचे अब्दालीचे स्वप्न अपूरे राहिले, अशी माहिती आहे. नागा साधूंनी गुजरातमधील जुनागडच्या निजामाशी घनघोर युद्ध केले, असेही म्हणतात. या युद्धात नागा तपस्वींनी निजाम आणि त्याच्या सैन्याचा पराभव केला होता. नागा साधूंचे कौशल्य पाहून निजाम देखील प्रभावित झाला आणि शेवटी, त्याला भिक्षूंपुढे गुडघे टेकून त्यांना तहासाठी आमंत्रित करावे लागले.

**धर्मरक्षणाचे काम**

अ. १६६६ साली हरिद्वार येथील कुंभमेळ्यात औरंगजेबाने तपस्वी आणि भाविकांवर हल्ला केला. या हल्ल्याला तपस्वींनी चोख प्रत्युत्तर दिले. मुघल सैन्यातील मराठा सैनिकांना जेव्हा संन्याशांचे भगवे ध्वज दिसले, तेव्हा तेही मुघलांशी लढले. त्यामुळे मुघल सैन्याचा पराभव झाला.

ब. असंख्य तपस्वींनी आपले प्राण अर्पण केले आणि अहमदशाह अब्दालीचे १७४८ आणि १७५७ मध्ये मथुरेवरील आक्रमण परतवून लावले.

क. १७५१ ते १७५३ मध्ये नागा तपस्वी राजेंद्रगिरी यांच्या नेतृत्वाखाली झाशीतील ३२ गावांमधून मुघल राजवट संपवली गेली आणि त्यांनी या भागात स्वातंत्र्याचा झेंडा फडकवला. १७५१ मध्ये फारुखाबादचा बंगश अफगाण सरदार अहमद खान याने प्रयाग येथे हिंसाचार आणि लूटमार केली

आणि चार हजार उच्चवर्णीय स्त्रियांचे अपहरण केले. त्यावेळी कुंभपर्वासाठी त्रिवेणी संगमावर जमलेल्या सहा हजार नागा तपस्वींनी एकत्र येऊन बंगश अफगाण सरदाराच्या सैन्यावर हल्ला केला. तपस्वींनी अपहृत महिलांची सुटका केली आणि अनेक अफगाण सैनिकांना जखमी केले.

ड. सन १८५५ मध्ये, हरिद्वार येथील कुंभमेळ्याच्या वेळी, ओमानंदजी ( आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांचे गुरू ) आणि त्यांचे गुरू पूर्णानंदजी यांनी १८५७ साली ब्रिटिश शासकांविरुद्धच्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाची ब्लू प्रिंट तयार केली आणि संपूर्ण देशातून जमलेल्या तपस्वींच्या माध्यमातून संपूर्ण भारतभर ब्लू प्रिंट पसरवली. १८५८ साली प्रयाग येथे झालेल्या कुंभमेळ्यात नानासाहेब धुंधू-पंत, बाळासाहेब पेशवे, तात्या टोपे, अजमुल्ला खान आणि जगदीशपूरचे राजा कुंवरसिंह यांनी दशनामी तपस्वींच्या छावणीत ' दस्त ' बाबांच्या उपस्थितीत ब्रिटिशांना हुसकावून लावण्याची शपथ घेतली. भारताबाहेर. या शपथविधी सोहळ्याला शेकडो तपस्वी आणि संत उपस्थित होते.

केवळ संन्यासीच नव्हे, तर बैरागींनीही अनेकवेळा इतर धर्माच्या आक्रमकांविरुद्ध शस्त्रे घेऊन लढा दिला आणि अशा प्रकारे धर्मरक्षणाचे प्रमुख कर्तव्य पार पाडले. विद्वान असूनही, शैव आणि वैष्णव आखाड्यांच्या सशस्त्र तपस्वींनी नि:शस्त्र आणि शांतताप्रिय हिंदू समाजाला मोठा दिलासा दिला. या आखाड्यांमुळे सिंधच्या सीमेवर इस्लामच्या आक्रमणाला आळा बसला हे ऐतिहासिक सत्य आहे .

**निरंजनी आखाडा**

निरंजनी आखाडा हा कुंभातील आणखी एक लोकप्रिय आखाडा आहे आणि सन ९०४ मध्ये स्थापन झालेला हा जुना आखाड्यानंतरचा भारतातील दुसरा सर्वात मोठा आखाडा आहे. भगवान कार्तिकेय हे निरंजनी आखाड्याचे प्रमुख देवता आहेत आणि या आखाड्याचे मुख्यालय प्रयागराज किंवा अलाहाबाद येथे आहे.

**महानिर्वाणी आखाडा**

महानिर्वाणी आखाडा हा कुंभमेळ्यातील आणखी एक महत्त्वाचा आखाडा आहे ज्यात प्रशासनासाठी पाच सदस्यीय मंडळ आहे. ते कपिलमुनी महाराजांची पूजा करतात आणि त्यांचा वारसा दहा हजार वर्षांपेक्षा जुना आहे. अटल आखाड्याच्या सात साधूंनी ७४८ मध्ये आखाड्याची स्थापना केली. महानिर्वाणी आखाडा सातपैकी तीन प्रमुख शास्त्रधारी आखाड्यांपैकी एक आहे.

**अटल आखाडा**

अटल आखाडा हे देशातील प्राचीन आखाड्यांपैकी एक आहे जे गणपतीची पूजा करतात. या आखाड्यात फक्त ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांनाच परवानगी आहे. अटल आखाडा शाही स्नानादरम्यान नागा साधूंचा शपथविधी सोहळा आयोजित करतो. वाराणशीमध्ये अटल आखाड्याचा तळ आहे.

**आवाहन आखाडा**

एका मान्यतेनुसार, हिंदु धर्माच्या बळकटीकरणासाठी अशा आखाड्याच्या निर्मितीसाठी आवाहन आखाड्याने आदि शंकराचार्यांकडे लक्ष दिले. आवाहन आखाडा भगवान श्री दत्तात्रेय आणि श्री गजानन यांची पूजा करतो आणि त्यांचे मुख्यालय हरिद्वारमध्ये आहे.

**आनंद आखाडा**

हा हिंदू संतांचा आणखी एक जुना आखाडा आहे ज्याचे अध्यक्ष देव भुवन भास्कर सूर्यनारायण आहेत.

**निर्मोही आखाडा**

१७२० मध्ये हरिद्वार येथे निर्मोही आखाडा स्थापन करण्यात आला आणि ते वैष्णव आहेत. ते सहसा भगवान हनुमानाची पूजा करतात आणि श्री पंच सदस्य त्यांच्या मार्गदर्शनाखाली आखाड्याचे

नियंत्रण करतात.

आखाडे हे कुंभमेळ्याचा अविभाज्य भाग आहेत आणि ते त्यांच्या प्रमुख देवतेची समान मूल्ये, चालीरीती आणि विचारसरणीचे पालन करतात. तोफखाना आणि शास्त्रातही ते निपुण आहेत. येथे चर्चा केलेले शेवटचे पण सर्वच आखाडे अपवादात्मक धार्मिक तसेच ऐतिहासिक महत्त्व धारण करतात. पेशवाई मिरवणुकीद्वारे कुंभमेळ्यात त्यांचे आगमन तुम्हाला एक अवास्तव अनुभव देते आणि तुम्हाला परिपूर्ण पवित्रतेने तृप्त करते. म्हणून फक्त भारतातील पवित्र शहरांवर उतरा आणि सर्वात मोठ्या सांस्कृतिक वारशाची झलक पाहण्यासाठी प्रवाहासोबत जा.

आखाडे, त्यांच्या खोलवर रुजलेल्या इतिहासासह आणि विकसित भूमिकेसह, हिंदू अध्यात्म आणि संस्कृतीचा आधारस्तंभ आहेत. कुंभमेळ्यासारख्या कार्यक्रमांमध्ये त्यांची उपस्थिती त्यांच्या कायम प्रभावाचा आणि महत्त्वाचा पुरावा आहे. प्राचीन परंपरेचे संरक्षक म्हणून, आखाड्यांनी त्यांचे आध्यात्मिक सार जपत समकालीन आव्हानांशी जुळवून घेत काळाच्या ओहोटीवर यशस्वीपणे मार्गक्रमण केले आहे.

**महाकुंभमेळा केव्हा आणि कसा आयोजित केला जातो?**

- **प्रयागराज :** प्रयागराजमध्ये महाकुंभमेळ्याचे आयोजन हे जेव्हा गुरु ग्रह वृषभ राशीत असतो त्यावेळी केले जाते. सध्या गुरु याच राशीत आहे. १४ जानेवारी २०२५ रोजी मकर राशीत सूर्याचा प्रवेश झाल्यानंतर प्रयागराजमध्ये महाकुंभमेळ्याचे आयोजन केले गेले. गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वती यांचा संगम प्रयागराजमध्ये होतो.
- **हरिद्वार :** सूर्य मेष राशीत आणि गुरु ग्रह कुंभ राशीत प्रवेश करत असताना हरिद्वारमध्ये महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. हरिद्वारमध्ये गंगा नदीच्या काठावर महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते.
- **नाशिक :** गुरु आणि सूर्य हे दोन्ही ग्रह सिंह राशीत असतात, तेव्हा महाराष्ट्रातील नाशिक येथे महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. नाशिकमध्ये गोदावरी नदीच्या काठावर कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात येते.
- **उज्जैन :** सूर्य ग्रह मेष राशीमध्ये आणि गुरु ग्रह सिंह राशीमध्ये असताना, सूर्य देवाचे राशीत असताना उज्जैनमध्ये महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. उज्जैनमधील शिप्रा नदीच्या काठावर महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते.

**कुंभ आणि महाकुंभ यातील फरक जाणून घ्या**

उज्जैन, प्रयागराज, हरिद्वार आणि नाशिक येथे दर तीन वर्षांनी एकदा कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. हरिद्वार आणि प्रयागराजच्या काठावर ६ वर्षातून एकदा अर्ध कुंभमेळा आयोजित केला जातो. तर पूर्ण कुंभमेळा १२ वर्षांतून एकदा आयोजित केला जातो, जो प्रयागराजमध्ये होतो. १२ कुंभमेळे पूर्ण झाल्यानंतर महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते, याआधी २०१३ साली प्रयागराज येथे महाकुंभाचे आयोजन करण्यात आले होते.

**व्हॉटस्‌ॲपवरून साभार...**


सोने-चांदी मौल्यवान खरेदी !

गोखले ब्रदर्स

सराफी दुकान

सोमवार, दि. 10 पुष्य नक्षत्र

रविवार, दि. 30 गुढीपाडवा

आपलं दुकान

महाद्वार रोडवर, 0231-2546585

# ऋतू बरवा - शिशिर

टीव्हीवर कुठलं तरी गाणं लागलं होतं... नायिका उदास चेहऱ्याने... आजूबाजूच्या उजाड टेकडीवर... निष्पर्ण झाडांमधून फिरत होती...

तिच्या भावना समजतील असा राग... सूर संगीत तर होतंच पण आजूबाजूच्या निसर्गाचे देखील तेच स्वरूप दिग्दर्शकाने दाखवले होते.

मनात विचार येऊन गेला, मनुष्य अन् निसर्ग एकमेकांशी किती प्रकारे जोडला गेलाय याचंच हे एक उदाहरण आहे.

ऋग्वेदात पाच ऋतू मानले गेले आहेत ज्यात शिशिर ऋतूचा समावेश हेमंत ऋतूशी एकत्रित केला आहे. ऋतुसंहारात कालिदासाने थंडीचा हा ऋतू स्त्रियांसाठी, प्रेमींसाठी किती आणि कसा लाभदायक याची पाचव्या सर्गात वर्णने केली आहेत.

शिशिर ऋतू हा हिंदू दिनदर्शिकेनुसार मार्गशीर्ष आणि पौष महिन्यात असतो. ग्रेगोरियन कॅलेंडरनुसार, डिसेंबर महिन्याच्या उत्तरार्धात, जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्याच्या पूर्वार्धात शिशिर ऋतू असतो. शिशिर ऋतूला हिवाळा असेही म्हणतात.

शिशिर ऋतू म्हणजे हिवाळ्यातील शेवटचे महिने. हेमंत आणि शिशिर ऋतू एकत्र थंड, बर्फाळ हिवाळा तयार करतात. शिशिर ऋतू हिवाळ्यातील संक्रांतीने सुरू होते. सूर्य जेव्हा आकाशातील सर्वोच्च वातावरण शुष्क, पानगळीचा मोसम पुन्हा सुरू होतो. पाण्याची कमतरता झाडांना जाणवते आणि बाष्पीभवन थांबवण्यासाठी पानं गळतात. ज्या झाडांची मुळे खोल गेली आहेत त्यांची पानगळ होत नाही. ज्याची पानगळ झाली आहेत, त्यांवर भडक फुलांचा साज चढतो आणि परागीभवन सोपं होतं.

शिशिर ऋतू आपल्या या वेगळेपणासाठी खास वाटतो. आपल्याला आजूबाजूला निसर्गाच्या अनेक रूपांकडे पाहताना आपल्याला जाणवतं. निष्पर्ण पानांचा वृक्ष सुध्दा कितीतरी मनोहारी दिसतो तो त्याच्या गडद रंगाच्या फुलांमुळे.

फुलांचा भडक रंग अन् संध्याकाळचे सांजरंग ल्यालेले आभाळ मनाला परमेश्वराची अगाध लीला पटवून जातो.

दुर्गा भागवत यांच्या ऋतूचक्र पुस्तकात शिशिर ऋतूचे सुंदर वर्णन आपल्याला वाचायला मिळते.

लहानपणापासून आपण हे सारे बदलते रूप बघत असतो. पानं नसलेली झाडं उगीच गंभीरपणे उभी राहिलेली दिसतात. खरतरं पानांमुळे झाडाचा डेरेदारपणा डोळ्यात भरत असतो. पण हीच पानं जमिनीतील पाणी कमी कमी होत चालल्यामुळे हळूहळू गळू लागतात. पृथ्वीवरचा जलसाठा कमी व्हायला सुरूवात होत असते. हे यातून आपल्याला कळत असते. हळूहळू झाडं चैतन्य हरवल्यासारखी भासू लागतात.

माघात वातावरणात ही एक प्रकारची स्तब्धता भरलेली आढळून येते. झाडे तर बरीचशीं पर्णहीन झालेली असल्यामुळे, पानांचा डौल हालचाल,सबंध झाड वाऱ्याबरोबर हालल्यासारखे वाटणारें दृश्य, त्यांतल्या त्यांत झाडांवर, पानांवर, बघाल तिथे धुळीचे थर साठलेले दिसतात. एक प्रकारचा जडपणा आल्यासारखा वाटतो.

वेगवेगळ्या भौगोलिक भागांमधे याचे स्वरूप वेगळे दिसते. घाटमाथ्यावर हिरवीगार उसाची शेती दिसते पण आजूबाजूला मोठाली उजाड पर्णहीन झाडं दिसतात. कोकणात सागाच्या झाडांचे सांगाडे. शुष्क जाळीदार पानांचा खच एका बाजूला दिसतो तर त्याच भूमीत करवंद, आंबा, फणस, काजू ही झाडं हिरवाईच्या रूपानी नटलेली दिसतात. करवंदीच्या जाळ्यांना हळूहळू येणारा ऋतूराज मोहवताना दिसतो.

अशा अनेक बदलांचा आपल्या मानवी जीवनावर परिणाम तर होतोच पण आपण त्यातही

आपले सण-उत्सव निसर्गाच्या या रूपाला समाविष्ट करून साजरे करतो, हे किती छान आहे.

पुरातन काळापासूनच इक्षु म्हणजेच ऊस याला शिशिरातील धरणीचे आच्छादन म्हंटले आहे. म्हणूनच तर संक्रातीनंतर ऊसाचा रस यथेच्छ प्यायला जातो.

सणांचा विचार करता, महाशिवरात्री, माघी चतुर्थी आणि होळी, रंगपंचमी हे सण येतात. नवरंगात सगळा आसमंत, प्रत्येक राधा-कृष्ण रंगून जातात ! उत्तर भारतात याचा विशेष आनंद असतो. अशा अनेक रंगांनी शिशिर ऋतू उदासीकडून नव चैतन्याकडे नेणारा ठरतो. म्हणूनच अनेक लोकपरंपरा, लोकसमुदायामधून आपल्याला ऋतूंशी संबंधित जीवनशैली आढळते.

निसर्गाच्या चिरसंगतींत राहणाऱ्या आदिवासींनीं यौवनोत्सव याच महिन्याच्या पूर्णिमेला करायची प्रथा पाडली. संपूर्ण निष्पर्णतेचा, संपूर्ण पुष्पमय विकसनाशीं संबंध असा जोडलेला दिसतो.

आजकाल बदलत्या काळानुसार सणांचे उत्सवांचे स्वरूप बदलते आहे. पण त्यामुळे निर्माण होणारे अनेक दुष्परिणाम हे ऋतूंना जाणून न घेता कृती केल्यामुळे होतात.

अर्थात म्हणूनच आरोग्याच्या दृष्टीने देखील शिशिर ऋतूत विशेष काळजी घ्यावीच लागते. या ऋतूमध्ये थंडीमुळे त्वचा कोरडी पडते आणि खाज सुटते.

शिशिर ऋतूत सांधेदुखी, संधिवात, आमवात, दमा यांसारखे आजार होतात. थंडगार वाऱ्यामुळे वातविकार आणि कफविकार उद्भवतात.

शिशिर ऋतूत कोरडी आणि खाज सुटणारी त्वचा, सर्दी, खोकला, इन्फ्लूएंझा, ब्राँकायटिस यांसारखे रोग होतात.

शिशिर ऋतूत उष्ण पदार्थ उपयुक्त ठरतात.

शिशिर ऋतूमध्ये संतुलित आहार घेणे आवश्यक आहे.


एकूणच पौष आणि माघाच्या या मध्यबंधावर आपल्या खुणा उमटवून जाणारा शिशिर वरून असा उदास, निर्जीव, निष्पर्ण, कोरडा, सुकलेला दिसला तरी आतून मात्र नवनिर्मितीचे बीजरोपण करत असतो. या अशा निसर्गाच्या बदलामधून हे जाणवतं की नवनिर्मितीसाठी प्रत्येक जीवाला आधी पूर्वतयारी करावीच लागते. काही वेळा थोडे नुकसान, कमतरता याचाही आनंदाने स्वीकार करावा लागतो. पानांच्या त्यागातून निर्माण होणारा नवीन अंकूर जीवसृष्टीला सुजनाचे समाधान देणार असतो मात्र नक्की !!!

**– वैदेही जोशी**

मोबा. ९५४५६३५४६५

**दिनविशेष (मार्च २०२५) शोभननाम - क्रोधीनाम संवत्सरे** **सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**फाल्गुन-चैत्र १९४६** **श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे। साक्षात लक्ष्मी वसे तिथे।**



**शनिवार दि. १ :** श्री रामकृष्ण परमहंस जयंती, **सोमवार दि. ३ :** जागतिक वन्यजीव दिन, **शनिवार दि. ८ :** जागतिक महिला दिन, **सोमवार दि. १० :** सावित्रीबाई फुले पुण्यदिन, **मंगळवार दि. ११ :** छ.संभाजीराजे बलिदान दिन, **गुरुवार दि. १३ :** हुताशनी पौर्णिमा, **शुक्रवार दि. १४ :** धूलिवंदन, **सोमवार दि. १७ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.१३), शिवजयंती (तिथीप्रमाणे), **बुधवार दि. १९ :** रंगपंचमी, **बुधवार दि. २६ :** संत बाळूमामा उत्सव, आदमापूर, **शनिवार दि. २९ :** छ. संभाजी महाराज पुण्यतिथी, **रविवार दि. ३० :** गुढीपाडवा, **सोमवार दि. ३१ :** स्वामी समर्थ प्रकट दिन, संत झुलेलाल जयंती

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे.

**– व्यवस्थापक**

श्री भगवानुवाच । **अध्याय ६ : आत्मसंयमयोग**

**देव म्हणती योगाभ्यासी नाश नाहीं । ऐसे नाहीं कवणासी घडलें पाही । बापा मोक्षमार्ग चालता कहीं । दुर्गति नव्हे ।।**

ऩ ह्या लोकीं न त्या लोकीं नाश तो पावतो कधी ।
शुभंकारी कुणी बापा दुर्गतीस न जातसे ।।४०।।

**पुण्यवंत जो लोक स्वर्गवासी । तो भ्रष्ट पावोनी भोग भोगिती सुखेसी । मग तो उपजे पवित्र हो इहलोकी वंशी । लक्ष्मीवंताचे घरी जन्मे ।।**

पुण्य-लोकांत राहूनि तो योग-भ्रष्ट संतत ।
शुचि साधनवंतांच्या घरी जन्मास येतसे ।।४१।।

**अथवा योगीयाचे कुळीं जन्मोनी । आपुलिया पूर्व पुण्यें करूनी । हे लोकामाजी दुर्लभ म्हणोनी । मानिती जग समस्त ।।**

अथवा प्राज्ञ योग्यांच्या कुळीं चि मग जन्मतो ।
अवश्य हा असा जन्म लोकीं अत्यंत दुर्लभ।।४२।।

**जया जन्मदेह पूर्व बुद्धि । संयोगे विचरी योग सिद्धी । मोक्ष प्रयत्न करी आधी । ज्ञानाभ्यासबळे ।।**

तिथें तो पूर्व-जन्मीचा बुद्धि-संस्कार जोडुनी ।
मोक्षार्थ करितो यत्न पूर्वीहूनि पुढें पुन्हां ।।४३।।

**हृदयीं होता पूर्वाभ्यासाचा धडा । म्हणोनी योग तयासी स्मरला पुढा । योगातें जाणोनी इच्छितो विचार गाढा । शब्द ब्रह्मीं वर्ततो ।।**

पूर्वाभ्यास-बळानें तो खेंचला पर-तंत्र चि ।।
जिज्ञासेनें हि योगाच्या जाती वेदांस लंघुनी ।।४४।।

**तो स्वयें ज्ञान प्रयत्न करी । योगें दोष दु:खे होती दुरी । मग तया बहु जन्मांतरी अवधारी । परमगति तो पावे ।।**

योगी तत्पर राहूनि दोष जाळित जाळित ।
अनेक जन्मी संपूर्ण होउनी मोक्ष पावतो ।।४५।।

**तपस्वी आणि ज्ञानी । अत्यंत कर्मनिष्ठ असोनि । या परिस योगी अधीक जाणोनी । या कारणे तूं योगी होय ।।**

ज्ञानी तापस कर्मिष्ठ ह्या सर्वांहूनि आगळा ।
मानिला तो असे योगी योगी होईं म्हणूनि तूं।।४६।।

**सर्व योगेश्वरा माझारी । माझे ठायीं अंत:करण ठेवी निर्धारी । तेचि भक्तियुक्त अवधारी । तो योगी मज मानला ।।**

सर्व योग्यांमधें योगी जीव माझ्यांत ठेवुनी ।
श्रद्धेनें भजतो मातें तो थोर मज वाटतो ।।४७।।

इति श्रीमद्‌भगवद्‌गीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे आत्मसंयम योगो नाम षष्ठोऽध्याय: ।।६।। श्रीकृष्णार्पणमस्तु

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस्‌ ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# मुलांचे पान




## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

### (लेखांक एकोणचाळिसावा)

दुसऱ्या दिवशी सकाळी, दिवसाच्या दुसऱ्या प्रहारी धर्मसभेत जायचं ठरलं होतं. निवृत्ती-ज्ञानेश्वर तिथं कसं जायचं, विनायकबुवांना तिथं काय सांगायचं, आपण तिथं जाऊन काय बोलायचं, याची चर्चा करत होते. तर सोपान एकटाच श्रीकृष्णाच्या मूर्तीसमोर डोळे मिटून पद्मासन घालून बसला होता. आज सकाळपासूनच तो नि:शब्दपणे वावरत होता. त्याच्या कानांवर मात्र दोघांचा संवाद पडत होता. निवृत्तीदादानं प्रश्न केला, ''ज्ञानेशा, तुला खरंच असं वाटतंय, की आपल्याला मौजीबंधनासारख्या संस्काराची आवश्यकता आहे? आपण आता जसं समाजापासून अलिप्त होऊन राहतो आहोत, तसंच जन्मभर राहिलो तर? मग कशाला हवे आहेत हे समाजाभिमुख संस्कार? पाप आणि पुण्य हा ज्या-त्या आत्म्याचा आविर्भाव आहे. आपण काय केलंय, हे आत्म्याला विचारावं. त्याच्याकडून जे उत्तर येईल, ते खरं. मग कशाला हवी आपल्याला या समाजाची स्वीकृती?'' निवृत्तीनं विचारलेल्या या प्रश्नावर ज्ञानेश्वर काही बोलला नाही. पुन्हा निवृत्तीनं विचारलं, ''ज्ञानेशा, आपण त्या ईश्वराची परमभक्ती करतो. मी परवा तुला भक्ती संप्रदायाबद्दल सांगत होतो, तेव्हा तू काय म्हणाला होतास आठवतं?'' ज्ञानेश्वर खाली मान घालून बसला होता. निवृत्तीदादाच्या या प्रश्नावर त्याने चटकन मान वर केली. म्हणाला, ''होय दादा ! चांगलंच आठवतंय. मी म्हणालो होतो -

**''देवाचिये द्वारी। उभा क्षणभरी।**
**तेणे मुक्तीचारी। साधियेल्या ।।''**

निवृत्तीच्या डोळ्यांत समाधान उमटलं. ''होय ना ज्ञानदेवा? मग हा उपनयन संस्कारचा, समाज समावेशाचा आग्रह कशासाठी?'' निवृत्तीच्या या प्रश्नावर ज्ञानेश्वराच्या चेहऱ्यावर हास्यरेषा उमटली. त्याच्या लक्षात आलं, दादा परीक्षा पाहताहेत. एक क्षण त्यानं विचार केला. म्हणाला, ''दादा, मला मान्य आहे की, आपण संन्यस्त वृत्तीनं राहिलो, तर या सगळ्याची काय आवश्यकता आहे; पण दादा, संन्यस्त वृत्तीनंही आपण राहणार, ते या समाजातच ना? ज्या समाजात अज्ञान, अंधश्रद्धा पसरलेली आहे त्याच समाजाला शहाणं, डोळस करण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत ना? मग त्या समाजाचे काही नीतीनियम, आचारसंहिता आपण पाळायला नको? दादा, ही अनुमती आपण आपल्यासाठी नाहीच घेणार आहोत, तर आपल्याला समाजात मिसळूनच समाजमन जाणलं पाहिजे. तरच त्यातील मळ आपल्याला स्वच्छ करता येईल, त्यासाठी घेतो आहोत. खरं ना? मी सांगतोय ते बरोबर आहे ना दादा?'' ज्ञानेशानं नम्रपणानं विचारलं. निवृत्तीदादा हसला. त्यानं प्रसन्नतेनं मान हलवली. ''खरं आहे ज्ञानेशा तू म्हणतोस ते ! आपण संन्यस्त वृत्तीनं राहिलो, तरी याच समाजात राहणार आहोत. आपण जाऊ या धर्मसभेत !'' निवृत्तीदादाची संमती मिळताच ज्ञानेशाला बरं वाटलं. तोच त्याच्या लक्षात आलं, की निवृत्तीदादा त्याला काहीतरी खुणावतोय. त्याने पाहिलं, त्याचा निर्देश सोपानाकडे होता. ज्ञानेशाच्या लक्षात आलं. सोपान डोळे मिटून बसला होता; पण त्यानं आपला संवाद ऐकला असणार, याची ज्ञानेशाला खात्री होती. म्हणूनच त्यानं मुद्दामच विचारलं, ''सोपान, तुझे काय विचार आहेत या विषयाबद्दल? आम्ही ऐकायला उत्सुक आहोत.'' ज्ञानेशाच्या बोलण्यावर सोपानानं डोळे उघडले. एकदा गोपाळकृष्णाला नमस्कार करून त्यानं पद्मासन सोडलं. तिथून उठून तो निवृत्तीदादाजवळ आला. दादाच्या चरणांवर डोकं ठेवून त्यानं प्रणाम केला. ज्ञानादादालाही त्यानं प्रणाम केला. ज्ञानेशानं पुन्हा विचारलं, ''सोपाना, राजा सांगा ना? तुझं काय मत आहे?'' सोपानानं एकदा निवृत्तीदादाकडं

पाहिलं, म्हणाला, ''ज्ञानादादा, तू म्हणतोस तेही खरं आहे आणि निवृत्तीदादा म्हणतो तेही बरोबर आहे; पण सांप्रत परिस्थितीत मला तुझंच म्हणणं संयुक्तिक वाटतंय; पण त्यामुळे ईश्वराचं अधिष्ठान कमी होत नाही आणि भक्तीचं प्रतिष्ठानही; कारण –

**भक्ती हे सरति । जाति न सरती ।**

**ऐसी आत्म स्थिती । स्वसंवेद्य ।।**

असं असताना भक्तीचं अधिष्ठान मानून अज्ञानाला उद्‌बोधन करावं आणि ते करण्यासाठी समाज स्वीकृती जरूरीची असेल, तर अवश्य घ्यावी.'' सोपान बोलत होता. सहजपणे बोलत होता आणि निवृत्ती-ज्ञानेश्वर डोळे विस्फारून बघत होते, तर मुक्ता अंगणात रांगोळी काढता-काढता आत आली आणि सोपानाचं विवेचन ऐकून तिलाही नवल वाटलं. सोनानानं बोलणं संपवलं. त्यानं निवृत्तीदादा आणि ज्ञानादादाकडे पाहिले; पण दोघंही नि:शब्द होते. मुक्ताही स्तिमित होऊन नि:शब्द उभी होती. काही क्षण त्या झोपडीत स्तब्धता पसरली. वाराही वाहायचा थांबला. तोही शांत झाला. छतातून पडणाऱ्या किरणांच्या कवडशांनीही आपला खेळ थांबवला. तेही नि:स्तब्ध झाले. जणू सूर्यानंही स्वत:ला थांबवलं. पृथ्वीचीही गती थांबली असावी. इतकी... इतकी नीरव शांतता, इतकी निर्ध्वनी स्तब्धता तिथं पसरली.

सोपान भांबावला. त्याला कळेना ही सगळं अशी मूक का झालीत? आपलं काही चुकलं काय? आपल्या हातून काही अगोचरपणा तर झाला नाही ना? एकदा त्याला वाटलं दोघांनाही विचरावं; पण त्याला धाडस झालं नाही. तो काही न बोलता हात जोडून नतमस्तक होऊन दोघांसमोर उभा राहिला. कोणी काहीच बोलत नव्हतं. सोपान मूक होता, एका अनामिक भीतीनं ! तर निवृत्ती, ज्ञानेश्वर, मुक्ता नि:स्तब्ध होते भारावून गेल्यामुळे ! चौघंही वेगवेगळ्या मन:स्थितीत असूनही चौघांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. यातून प्रथम सावरला निवृत्तीदादा. ''सोपाना ऽ ऽ ! माझ्या बाळा ऽ ऽ!'' अशी गहिवरल्या आवाजात साद घालून निवृत्तीदादांनी सोपानाला मिठीत ओढलं. पाठोपाठ ज्ञानेश्वरानंही त्या दोघांच्या मिठीत स्वत:ला झोकून दिलं. निवृत्तीदादा काही बोलत नव्हता. तो फक्त ''सोपानाऽ सोपानाऽ'' असं म्हणत सोपानाला कुरवाळत होता. ज्ञानेश्वर त्याच्या मस्तकावरून हात फिरवत होता, तर मुक्ता त्या तिघांच्या शेजारी उभी राहून डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंची पर्वा न करता तिघांना एकटक बघत होती. आनंदाचा, कौतुकाचा, गहिवराचा, अश्रूंचा पहिला आवेग, पहिला भर ओसरला. सोपानाला आपल्या मिठीतून सामोरं करून निवृत्तीदादानं विचारलं, ''सोपाना, ओवीबद्ध शब्दरचना? कधीपासून करतो आहेस रे? आणि कधी शिकलास? कुठं शिकलास? आणखी काय काय लिहलंयस?'' निवृत्तीदादाच्या प्रश्नांच्या माऱ्यानं आधीच त्याच्या मिठीत कोंडलेला सोपान आणखीच घुसमटला. ''दादा ऽ दादा, किती प्रश्न विचारशील? अरे तो बघ तरी कसा कावराबावरा झालाय? सोपाना खरं सांगू? माझा तर विश्वासच बसत नाहीय. दादा, आपला सोपान मोठा झाला नाही रे? मुक्ता, बघितलंस का?'' ज्ञानेशालाही किती बोलू आणि किती नको असं झालं होतं. तोच सोपान संकोचत म्हणाला, ''दादा, मी-मी हे तुमचं आणि ज्ञानादादाचं बघूनच शिकलो. ज्ञानादादाची ओवी लिहून झाली, की मी हळूच वाचतो आणि मग मलाही काहीबाही सुचतं. ते मी लिहून ठेवतो. दादा, माझं काही चुकलं का?'' सोपानाचा कावराबावरा चेहरा, त्याचा कापरा स्वर, चेहऱ्यावरचा संकोच, हे सगळे बघून निवृत्तीला हसू आले. म्हणाला, ''नाही सोपाना, नाही ! अरे तुझं काहीच चुकलं नाही उलट... उलट ज्ञानेशा तुला सांगतो, मी जेव्हा सोपानाला शिकवण्याचं ठरवलं, तेव्हा मला वाटलं, की हा खूपच लहान आहे आणि वेद, उपनिषदं, अध्यात्म, हटयोग हे सगळं याला कसं समजणार आणि ते याला समजण्याइतपत सोपं करून मला सांगता येईल का? माझ्या मनात अशा शंका उत्पन्न होत होत्या; पण सोपाना, तुझी ओवीबद्ध शब्दरचना ऐकली आणि मला अति आनंद झाला आणि तोही द्विगुणित झाला !'' ''द्विगुणित झाला? तो कसा रे दादा?'' मुक्तीनं विचारलं. (क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००

# ब्राह्मण आणि सरकारी अनुदान

**भाग २**

आधीच्या लेखात आपण अमृतच्या विविध योजनांबद्दल संक्षिप्त माहिती घेतली. आता आपण या लेखमालेत, प्रत्येक योजनेबद्दल तपशीलवार माहिती घेऊ. शैक्षणिक अर्थसहाय्य योजना

या योजनेखाली अलीकडेच खालील योजना जाहीर झाली आहे.

AIIMS, IIT, IIM, IIIT संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य योजना. प्रथम आपण या संस्थांबद्दल जाणून घेऊ.

- **AIIMS -** (ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस) ही संस्था दर्जेदार उच्च वैद्यकीय शिक्षण देते. तिची भारतभर २२ केंद्रे आहेत.
- **IIT -** (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) ही संस्था दर्जेदार उच्च सायन्स, इंजिनीअरिंग आणि कला क्षेत्रात शिक्षण देते. याच्या देशभरात २३ शाखा आहेत.
- **IIM -** (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेण्ट) ही संस्था उच्च दर्जाचे व्यवस्थापन शिक्षण पुरवते. हिच्या एकूण अठरा शाखा आहेत.
- **IIIT -** (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी ही उच्च दर्जाचे इन्फॉर्मेशन टेकनॉलॉजी आणि कॉम्प्युटर सायन्स चे शिक्षण पुरवते. हिच्या एकूण २५ शाखा आहेत.

वरील सगळ्याच संस्था अत्यंत नामवंत असून खूप कठीण परीक्षेनंतर त्यांच्यामध्ये प्रवेश मिळतो आणि त्यांच्या अभ्यासक्रमानंतर विद्यार्थ्यांना उज्वल भवितव्य असते.

AIIMS चे शैक्षणिक शुल्क सगळ्यात कमी आहे. पण बाकी सगळ्याच संस्थांचे शैक्षणिक शुल्क लाखो रुपयांच्या घरात आहे. पण आजकाल बँकाकडून शैक्षणिक कर्ज मिळण्याची सुविधा आहे आणि या कर्जाच्या परतफेडीचा हप्ता, शिक्षण संपल्यावर सुरू होतो, गृहितत्व असे की शिक्षण संपल्यावर विद्यार्थ्यांना चांगले उत्पन्न मिळायला सुरुवात होईल आणि ते कर्ज फेड सहज करू शकतील. या संस्था नामवंत असल्यामुळे बँकाकडून कर्ज मंजूर होण्यास अडचण येत नाही. शिवाय ज्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ४.५ लाखाच्या आत आहे, त्यांच्याकरता केंद्र सरकारची अशी सोय आहे की त्यांच्याकरता, संपूर्ण शैक्षणिक कालावधी अधिक १२ महिने त्यांनी कर्जावर भरलेले व्याज अनुदान स्वरूपात परत मिळेल.

वरील संस्थांचे सर्व अभ्यासक्रम निवासी स्वरूपाचे असतात आणि सर्व अभ्यासक्रम हे दीर्घ मुदतीचे असल्याने विद्यार्थ्यांचा हॉस्टेल आणि जेवणखाण यावरील खर्च पण खूप असतो. या करता अमृत ही संस्था खालील योजना राबवते.

**योजनेचा उद्देश**

अमृतच्या लक्षित गटातील विद्यार्थ्यांना AIIMS, IIT, IIM, IIIT या संस्थांमध्ये दर्जेदार शिक्षण घेणे सुकर होण्यासाठी अर्थसहाय्य देणे.

**योजनेचा लक्ष्यगट**

खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग / संस्था / महामंडळा मार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अमृताच्या लक्षित गटातील विद्यार्थी ज्यांनी AIIMS, IIT, IIM, IIIT या संस्थांमध्ये प्रवेश घेतला आहे असे उमेदवार.

**लाभार्थी निवड निकष**

१. अर्जदाराने अमृत संस्थेच्या सर्वसाधारण लाभार्थी निकषांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.
२. अर्जदाराने या योजनेसाठी अर्ज करताना संबंधित संस्थेत प्रवेश मिळालेल्या निवड पत्राची व प्रवेश घेतलेल्या प्रवेशपत्राची स्व स्वाक्षरीत प्रत जोडावी.

३. संस्थेच्या ओळखपत्राची स्वस्वाक्षरीत प्रत सादर करावी.

४. संस्थेच्या बोनाफाईड प्रमाणपत्राची स्व स्वाक्षरीत प्रत सादर करावी.

५. प्रतिवर्षी लाभासाठी अर्ज करणे क्रमप्राप्त आहे. त्यासोबत वरील ते ४ ची पूर्तता व त्या वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र व उत्तीर्ण झालेल्या निकालपत्राची स्वस्वाक्षरीत प्रत सादर करावी.

६.अर्जदाराच्या वैयक्तिक आधार संलग्न बँक खात्याचा तपशील : बँकेचे नाव, शाखा, खाते प्रकार, खाते क्रमांक, IFSC कोड.

**अर्ज करण्याची पध्दत**

योजनेच्या लाभासाठी इच्छुक अर्जदारांनी अमृत संस्थेच्या संकेतस्थळावर www.mahaamrut.org.in ऑनलाईन अर्ज करावेत. त्यासोबत आवश्यक कागदपत्रे/दस्तऐवज अपलोड करावेत. तसेच, अर्जाची हार्ड कॉपी स्वाक्षरीत करून त्यासोबत आवश्यक सर्व दस्तऐवज कागदपत्रे स्वसाक्षांकित करून अमृत कार्यालयास सादर करावी.

**लाभाचे स्वरूप**

१. या संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या शाखेचा सपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत रक्कम रु. १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) प्रति विद्यार्थी प्रति महा प्रमाणे प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील.

२. प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य लाभाचा कालावधी प्रत्येक शैक्षणिक वर्षातील ११ महिने धरण्यात येईल.

३. सदर प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य रक्कम वर्षातून दोन वेळेस (प्रत्येक सेमिस्टर उत्तीर्ण झाल्यावर एकदा याप्रमाणे) लाभ धारकांच्या खात्यात जमा करण्यात येईल.

४. एका सत्रासाठी प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य मिळाल्यानंतर पुढील सत्रासाठी मागणी करताना मागील सत्रात उत्तीर्ण झाल्याच्या पुराव्यासाठी गुणपत्रिकेची (मार्कशीट) स्व साक्षांकित प्रत जोडावी.

**योजने संदर्भात खालील गोष्टी विशेष नमूद कराव्याशा वाटतात.**

**१) काही कारणाने जर शिक्षणात खंड पडला तर ?**

जर विद्यार्थी अनुतीर्ण झाला किंवा इतर कारणाने शिक्षणात खंड पडला तर, तर उत्तीर्ण झाल्यावर अथवा शिक्षण पुन्हा सुरु झाल्यावर, योजनेचा लाभ परत सुरु होईल.

**२) कुटुंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येतो का ?** होय

**३) वरील संस्थांच्या विशिष्ट कोर्सला प्रवेश घ्यावा असे या योजनेत बंधन आहे का ?**

संस्थेच्या कुठल्याही शिक्षणक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येतो.

योजनेअंतर्गत करण्याचा अर्ज अमृत च्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

तरी वाचकांपैकी, पात्र ब्राह्मण विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेण्यास प्रोत्साहित करावे ही कळकळीची विनंती.

**– श्रीकांत शिंत्रे**

मोबा. ९६१९१९६७०५


**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**

**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**

खात्याचे नाव

**कोल्हापूर चित्पावन संघ**

**(खाते क्र. 20128506183)**

**IFSC Code : MAHB0000326**

**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**

**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**

खात्याचे नाव

**कोल्हापूर चित्पावन संघ**

**(खाते क्र. 090210110016181)**

**IFSC Code : BKID0000902**

**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

# तासगावचा पठ्ठ्या -
# उद्योगरत्न आबासाहेब गरवारे

इंग्रजांच्या घरात घुसून त्यांचेच घर विकत घेऊन, त्यांनाच नोकर म्हणून ठेवणारा सांगलीच्या तासगावचा पठ्ठ्या !

जेव्हा संपूर्ण भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीत खितपत पडला होता. भारतीयांना आपल्या भविष्याची खात्री नव्हती, गोऱ्यांची क्रूरता निष्पाप भारतीयांचं जगणं मुश्किल करून टाकत होती, अशा काळात सांगलीच्या एका चुणचुणीत तरुणाने थेट ब्रिटिश राजकुमाराचीच गाडी विकत घेऊन अख्ख्या इंग्लंडमध्ये ती दिमाखात फिरवली. आपल्या या कृतीने त्यांनी गोऱ्यांच्या मनात खदखद निर्माण केली. त्यांच्याच घरात घुसून भारताचा झेंडा फडकविला. त्याचे हे कार्य त्याकाळात कोणत्याही क्रांतिकारी घटनेपेक्षा कमी नव्हते.

कोण होता कोण हा तरुण? तो कोणी क्रांतिकारक नव्हता, की स्वातंत्र्यसेनानी नव्हता. तो होता सांगलीतील तासगावातला भालचंद्र गरवारे अर्थातच आबासाहेब गरवारे.

गरवारे म्हटलं की आठवतं ते पुण्यातलं गरवारे कॉलेज आणि गरवारे चौक. यापलीकडे आपल्याला काय माहितीये? मित्रांनो, पुण्यातल्या या कॉलेजला गरवारे नाव का दिलं गेलं? ते कॉलेज आबासाहेबांनी उभं केलं का? तर नाही. त्या कॉलेजचे संस्थापक आबासाहेब गरवारे नव्हते, मग का बरं गरवारे नाव दिलं गेलं असेल? जे जाणून घेण्यासाठी आपल्याला शंभर वर्ष मागं जावं लागेल.

तासगावमध्ये २१ डिसेंबर १९०३ रोजी एका ब्राह्मण शेतकरी कुटुंबात भालचंद्रचा जन्म झाला. घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे कसेबसे ६वी पर्यंतचे शिक्षण त्याने पूर्ण केले. पूर्ण कसले सहावीच्या मार्कलिस्टवर नापासचा शेरा मिळाला. भालचंद्रच्या वडिलांचं नाव दिगंबर गरवारे. वडिलांनी भालचंद्रला मुंबईला पाठवले. या सहावी नापास भालचंद्राने १९१८ साली म्हणजे वयाच्या जेमतेम १५ व्या वर्षी मुंबईच्या झगमगाटात पहिलं पाऊल टाकलं.

ब्रिटिशांचं वर्चस्व असणाऱ्या मुंबईत वावरणं थोडं कठीणच होतं. मुंबईत ब्रिटिशांनी लोकांचं जगणं नकोस करून टाकलं होतं. रस्त्यावरून एखादा गोरा अधिकारी जात असेल, तर लोक जिथे जागा मिळेल तिथे लपून बसायचे, कारण गोरे कधी काय करतील याचा काही नेम नव्हता. अशा परिस्थितीत भालचंद्र एका गॅरेजमध्ये काम करू लागला. गॅरेजमध्ये राहून तो गाड्या रिपेअरिंगची कामे शिकू लागला. मनापासून काम करून तो चारचाकी आणि दुचाकी गाड्या रिपेयरची कामे शिकला. गॅरेजमध्ये असताना भारतीयांचे होणारे हाल त्याने उघड्या डोळ्यांनी पहिले होते. पण बिचारा एकटा भालचंद्र ब्रिटिशांविरुद्ध कसा आवाज उठवणार होता, त्यामुळे आपण आणि आपलं काम इतक्यापुरताच तो मर्यादित राहायचा. ब्रिटिशांचं प्रगत तंत्रज्ञान आणि आधुनिकीकरणामुळे पुढच्या काही वर्षात ही वाहनं भारतीयांची गरज बनणार हे त्याने तेव्हाच हेरलं होतं. गॅरेजमध्ये काम करून भालचंद्रच्या ओळखी वाढल्या.

वयाच्या १७ व्या वर्षी गिरगावमध्ये डेक्कन मोटार एजन्सीची स्थापना करून तो जुन्या गाड्या खरेदी-विक्री करणारा एजंट बनला. सोबतच तो स्पेअर पार्ट, टायरची वगैरे विक्री करू लागला. थोड्याच दिवसात या व्यवसायात त्याचा चांगलाच जम बसला. त्याच्या गोडाऊनमध्ये आता गाड्यांना जागा नव्हती. सर्वसामान्य माणसापासून ते मुंबईतल्या राजे-रजवाड्यांपर्यंत सगळेजण डेक्कन मोटार एजन्सीमधून गाड्या घेऊ लागले. मुंबईत गाडी घ्यायचं म्हटलं की, प्रत्येकाच्या ओठांवर फक्त एकच नाव डेक्कन मोटार एजन्सी. एजन्सीचा नावलौकिक वाढला होता. त्यासोबतच भालचंद्र गरवारे मुंबईचे आबासाहेब म्हणून ओळखले जाऊ लागले. आबासाहेबांना पत, प्रतिष्ठा मिळू लागली. खिशात एक रुपयाही नसताना मुंबईत आलेला भालचंद्र आता आबासाहेब झाला होता. ब्रिटिशदेखील आबासाहेबांकडूनच गाड्या विकत घेऊ लागले.

एकदा एक ब्रिटिश अधिकारी आबासाहेबां-कडे गाडी खरेदी करण्यासाठी आला, गाड्यांची किंमत पाहून तो ब्रिटिश म्हणाला, 'We get cheaper cars in England than here and now prices have fallen considerably due to the recession there.' हे ऐकताच आबासाहेबांनी त्याच्याकडून अजून माहिती काढून घेतली, इंग्लंडमध्ये कमी किमतीतल्या गाड्या मिळतात हे ऐकल्यावर त्यांना वेध लागले ते इंग्लंड दौऱ्याचे. व्यवसायातून आलेल्या पैशांतून त्यांनी तडक इंग्लंड गाठले. इंग्लंडमधील पहिली सेकंड हँड गाडी त्यांनी ४० पौंडला विकत घेतली. हळूहळू त्यांनी एकापेक्षा एक चांगल्या दर्जाच्या सेकंड हँड गाड्या विकत घेतल्या. सेकंड हँड गाड्यांच्या दुनियेत आबासाहेबांनी लंडनमध्ये चांगलाच जम बसविला आणि तिथूनच ते नवनवीन बनावटीच्या जुन्या गाड्या भारतात पाठवू लागले.

आबासाहेबांनी केवळ गाड्यांचाच व्यवसाय केला नाही, तर त्यांनी प्लॅस्टिक बनविणारे कारखाने देखील विकत घेतले. ज्याकाळात भारतीयांना प्लॅस्टिक म्हणजे काय? हे देखील माहीत नव्हतं, अशा काळात आबासाहेबांनी भारतात प्लॅस्टिक बटणं, नायलॉन यार्न, प्लॅस्टिक इंजेक्शन मोल्डिंग, ब्लो मोल्डिंग, नायलॉन ब्रिस्टल्स, फिशिंग नेट अशी प्लॅस्टिकची अनेक उत्पादने घेऊन गरवारे मोटर्स, गरवारे प्लॅस्टिक, गरवारे वॉल रोप्स, गरवारे नायलॉन्स, गरवारे पेंट्स, गरवारे फिलामेंट कॉर्पोरेशन अशा अनेक कंपन्यांची उभारणी केली. या व्यापारात त्यांनी भरपूर पैसा कमविला. ज्या गोऱ्यांनी भारतीयांचे जिणे हराम करून सोडले होते. त्या गोऱ्यांची नाचक्की करायचं हे आबासाहेबांनी आधीच ठरवलं होतं. लंडनमध्ये असताना बकिंगहॅम पॅलेसमध्ये जाऊन प्रिन्स ऑफ वेल्सची, इंग्लंडच्या राजपुत्राचीच गाडी विकत घेतली. ती गाडी आणि त्यावर एक गोरा शोफर ठेऊन ते ताठ मानेने लंडनमध्ये फिरू लागले.

इतकंच नाही तर १९३४ साली त्यांनी लंडनमध्ये ३ एकर जमीन आणि काही अन्य मालमत्ता २२०० पौंडाला खरेदी करून त्या मालकालाच आपल्याकडे नोकरीस ठेवले. जेव्हा भारतात गुजराती, मारवाडी उद्योगपतींचा जन्म होऊ लागला होता, महाराष्ट्रात परप्रांतीय आपल्या उद्योगाचे बस्तान बसवत होते. त्याकाळात सांगलीच्या या तरुणाने चक्क इंग्लंडमध्ये आपल्या व्यवसायाचे बस्तान बसवलं. त्यांनी केलेला प्रत्येक उद्योग हा भारतीयांची अस्मिता जपण्यासाठीचा एक प्रयत्न होता.

जे ब्रिटिश भारतीयांना गुलाम म्हणून वागवत होते, त्याच ब्रिटीशांना आबासाहेबांनी त्यांच्यात घरात घुसून त्यांचेच घर विकत घेऊन, त्यांनाच नोकर म्हणून आपल्या पदरी ठेवून एक स्वाभिमानी, यशस्वी, देशप्रेमी मराठी उद्योजक बनण्याचा मान मिळविला होता. आबासाहेबांनी केवळ उद्योगच केला नाही, तर आपल्या कर्तुत्वाने ब्रिटीशांना तोंडात बोटं घालायला लावली. आबासाहेबांनी केवळ व्यापारच नाही केला तर शैक्षणिक, सामाजिक संस्थांना देखील सढळ हाताने मदत केली. भारत स्वतंत्र झाल्यावर १९५९ साली त्यांची मुंबईचे शेरीफ म्हणून नियुक्ती करण्यात आली. शेरीफ म्हणजे नगरपाल. आबासाहेबांनी पुणे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीला चांगलीच आर्थिक मदत केली आणि त्यामुळेच संस्थेने कॉलेज आणि हायस्कूलला १९४५ साली आबासाहेब गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स आणि सौ. विमलाबाई गरवारे हायस्कूल अशी नावे दिली. मुंबई university च्या अंतर्गत त्यांनी सांगलीत मुलींसाठी महाविद्यालय सुरू केले,

त्यांच्या याच कार्यकर्तुत्वामुळे त्यांना आर्थिक अभ्यास संस्थेतर्फे उद्योगरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. यासोबतच १९७१ मध्ये त्यांना भारत सरकारच्या पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सांगलीतील एका खेड्यातल्या मुलाचा गॅरेजमध्ये काम करण्यापासून ते पद्मभूषण पुरस्कार मिळवण्यापर्यंतच प्रवास खरच विस्मयकारक होता. हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला असं आपण यशवंतराव चव्हाणांच्या अतुलनीय कामाबद्दल अनेकदा म्हणतो, पण मित्रांनो हा भालचंद्र नामक सह्याद्री देखील हिमालयाच्या प्रत्येक अडिअडचणीत धावून गेला होता हे देखील विसरून चालणार नाही. त्यांच्या विचारांची ज्योत आज प्रत्येकाने आपल्या मनात निरंतर तेवत ठेवली पाहिजे...

**– आंतरजालावरून साभार**

# मेहेंदळे गुरुजींचे हरिहर विद्यालय

दत्तात्रय रामचंद्र मेहेंदळे तथा तात्या मेहेंदळे हे तात्या या नावाने प्रसिद्ध होते. नावाप्रमाणेच त्यांचा सर्वत्र दरारा होता. बरेच लोक त्यांच्यासमोर यायला घाबरत असत. दत्तात्रयचा अर्थ नायक, त्या प्रमाणे ते नायकही होते, नायकाला ज्याप्रमाणे सर्व जगाचा व्यवहार डोळ्यांत तेल घालून बघावा लागतो त्याप्रमाणे त्यांनी आपल्या शाळेकरिता-हरिहर विद्यालयाकरिता तन-मन-धन अर्पण करून ज्ञानदेवतेची मनोभावे पूजा केली व त्याकडे सतत डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवले. त्यामुळेच तर हरिहर विद्यालय म्हणजे मेहेंदळे गुरुजी असे समीकरणच समाजात तयार झाले होते.

द.रा. मेहेंदळे यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. त्यांचा जन्म १८९७ साली तत्कालीन हिंदळे, ता. देवगड, जिल्हा रत्नागिरी सध्या सिंधुदुर्ग येथे झाला .वडील रामचंद्र यांच्या मृत्यू नंतर त्यांची आई व भावंडे यांनी उदरनिर्वाहासाठी थेट कोल्हापूर गाठले. त्यांच्या आईने घरकाम करुन संसार सांभाळला. मेहेंदळे गुरुजी त्यांची भावंडे माधुकरी मागून, वारावर जेवून पोट भरत असत. लहानपणा-पासूनच कष्ट करून पोट भरावे असे गुरुजींच्या मनात रुजले होतेच. माधुकरी मागून त्यावर आपली गुजराण करणे त्यांच्या मनाला पटत नसे. त्यांना ते अपमानाचे वाटत असे. आणि म्हणूनच ते रोज एकाच घरी माधुकरी मागून आपली गुजराण करत.

दत्तोपंत मेहेंदळे यांची देहयष्टी उंचीपुरी व भारदस्त होती. त्यांची प्रकृती सुदृढ होती. धोतर, शर्ट, जकिट किंवा कोट व उंच टोपी हा मेहेंदळे गुरुजीचा पेहराव होता. अविवाहित राहून त्यांनी आपले जीवन शाळेसाठी समर्पित केले होते. लहानपणापासूनच साधी राहणी व उच्च विचारसरणी त्यांच्या अंगवळणी पडली होती. ते स्वतः शिस्तप्रिय होते व इतरांनीही म्हणजे केवळ शाळेतील विद्यार्थीच नव्हे तर शिक्षकांनीही शिस्त पाळावी ह्याकडे त्यांचा कटाक्ष असे. त्यांचा स्वभाव रागीट तसेच सडेतोड होता. ते जितके शिस्तीचे होते तितकेच हळवे आणि जिद्दी होते. अर्थात ही शिस्त सर्वांच्या भल्या करताच असे. एखाद्याने चूक केली तर या तोफखान्यासमोर यायची त्याची धमक होत नसे. त्यांच्या हा स्वभावामुळे बरीच माणसे त्यांच्यापासून दुरावली, पण त्यांनी त्याची फिकीर कधीच केली नाही. उलट ज्ञानदानात आपले सर्वस्वच पणाला लावले.

कोल्हापुरात भेंडे गल्ली येथे गोगटे (जे हरिहर विद्यालयाचे आद्य संस्थापक होते) त्यांची दुसरीची शाळा होती. त्या शाळेत ते शिक्षक म्हणून नोकरीस लागले. गोगटे यांना मुलगी असल्याने शाळेची जबाबदारी गोगटे गुरुजींनी मेहेंदळे गुरुजींवर सोपवली. सन १९२४ साली गोगटे यांचे देहावसान झाले. त्यानंतर ज्ञानदानाची धुरा मेहेंदळे यांनी समर्थपणे पेलली. एवढेच नव्हे तर शाळेचा विकास चांगल्या प्रकारे केला शाळा नावारूपास आणली. पुढे जाऊन सुरवातीला दुसरीपर्यंत असलेली शाळा नववीपर्यंत वाढवली. शाळेस मिळालेल्या विविध देणग्या व राजाश्रय याच्या जोरावर लक्ष्मीपुरी येथे जागा खरेदी करून शाळेची वास्तु उभी केली.

या शाळेजवळ एक खारतळे होते. या ठिकाणी चिखल, दलदल व केंदळ यांचे साम्राज्य होते. त्यामुळे तिथे रोगराई पसरत असे. हे लक्षात आल्यावर कोल्हापूरच्या महाराजांनी ते तळे बुजवून त्याच्या सुशोभिकरणाचा निर्णय घेतला व त्याची जबाबदारी मेहेंदळे गुरुजींकडे सोपवली. जेव्हा जागा सुशोभित झाली, तेव्हा महाराजानी ती जागा बक्षीस म्हणून बक्षीसपत्राने मेहेंदळे गुरुजी यांच्या नावावर कायमस्वरूपी करून दिली.

या ठिकाणी मेहेंदळे गुरुजींनी सुंदर बगीचा साकारला. या जागेचा उपयोग शाळेचे पटांगण म्हणूनही होऊ लागला, याच पटांगणावर नारळाची झाडे लावण्यात आली. शोभिवंत झाडे तसेच फुलझाडेही लावण्यात आली. या पटांगणाच्या उपयोग शनिवारी पी. टी. च्या कवायतीसाठी, तसेच शाळेतील मुलांना खेळण्यासाठी होऊ लागला, शाळेतील विद्यार्थ्यांना शेतीचे प्रात्यक्षिक इथेच दाखवले जाई. या जागेत मिरच्या, कोथिंबीर, मेथी, ऊस ह्यांसारख्या पिकांची लागवड केली. मेहेंदळे गुरुजी भल्या पहाटे

उठून या बगिच्यातील विविध प्रकारची फुले टोपल्यात भरून ठेवत व शाळा भरल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याला त्यातील एकेक फूल देत. ह्या फुलांच्या सुगंधाने शाळेतील वातावरणा बरोबरच विद्यार्थ्यांची मनेही प्रफुल्लित होत असत.

सन १९४८ च्या गांधी वधानंतर झालेल्या जाळपोळीत शाळेची संपूर्ण इमारत व सर्व रेकॉर्ड आगीत भस्मसात झाले. झाल्या प्रकाराने सगळेच हळहळले, पण दत्तोपंत अजिबात डगमगले नाहीत. उलट झालेले दुःख कोणासही न दाखवता तितक्याच उमेदीने या अग्निदिव्यातून बाहेर पडून शाळा परत पहिल्यासारखी उभी करण्यास सज्ज झाले. याचाच एक भाग म्हणून छत्रपतींच्या मदतीने दसरा चौकातील आय.टी.आय.च्या इमारतीचा रिसाला हा निम्मा भाग शैक्षणिक कामासाठी घेतला, मिळालेल्या जागेचा पुरेपूर वापर केला व शिक्षणाचे कार्य पुढे चालू ठेवले. हे करत असताना शाळेच्या गुणवत्तेत तीळभरही फरक पडणार नाही यावर कटाक्ष ठेवला. हे सर्व करत असताना कोणत्याही विद्यार्थ्यांला व शिक्षकाला वाऱ्यावर न सोडण्याचा त्यांनी चंग बांधला. पुढे काही काळानंतर आपले धाकटे भाऊ केशवराव मेहेंदळे आणि पुतणे माधवराव मेहेंदळे यांच्या मदतीने हरिहर विदयालय पुन्हा उभे करण्यात यश मिळवले.

द. रा. मेहेंदळे ही दृढनिश्चयी, जिद्दी व उमेद असणारी, स्वातंत्र्याचे व्रत घेतलेली, स्वदेशीचा जाज्वल्य अभिमान असणारी व्यक्ती होती. त्यांचा स्वभाव अत्यंत शिस्तप्रिय असून त्यांना माणसांची जबरदस्त पारख होती. शाळा, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणपध्दतीत असणारे त्यांचे विचार शाळेला एका वेगळ्या उंचीवर घेऊन गेले. म्हणूनच त्यांनी राबविलेल्या विविध योजना यांचा आढावा घेणे आवश्यक वाटते.

शाळेच्या केवळ सिमेंट काँक्रीटच्या इमारती, अद्ययावत फर्निचर म्हणजे शाळा नव्हे, आदर्श शाळा म्हणजे जीवित माणसांकडून चालवली जाते, जी आदर्श विद्यार्थी निर्माण करते, अशी मेहेंदळे गुरुजींची विचारधारणा होती. अर्थात या सगळ्या निकषांत हरिहर विद्यालय बसत होते.त्यांचे म्हणणे होते की विद्यार्थ्यांना निव्वळ शिक्षण देणे नव्हे, तर त्यांच्या अंगदत्त गुणांचा कानोसा घेऊन त्याला शिक्षण देणे हे महत्त्वाचे ! पुस्तकातील धड्यांपेक्षा त्याला व्यावहारिक ज्ञानाची जोड देणे अतिशय आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्याला शाळा, शिक्षण व देश ह्यांबद्दल आवड निर्माण करणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश असला पाहिजे. चांगला विद्यार्थी घडवण्यासाठी शिक्षक हा मोलाचा घटक आहे. मेहेंदळे गुरुजींनी त्यांच्या पारखी नजरेने त्या त्या विषयात पारंगत असणारे शिक्षक नेमले होते. नवीन शिक्षकांची नेमणूक करताना देण्यात येणाऱ्या जाहिरातीत ते जातिवंत शिक्षक पाहिजेत असे नमूद करत. याचे कारण असे की त्यांना वाटत असे की, जो जातिवंत शिक्षक असतो तोच चांगले ज्ञान देऊन आदर्श विद्यार्थी घडवू शकतो.

शिक्षकांनी वर्गात तयारीनिशी गेले पाहिजे व उभे राहूनच शिकवले पाहिजे असा त्यांचा दंडक होता. प्रत्येक शिक्षकाने आपल्या समोर असणारा विद्यार्थीवर्ग लक्षात घेऊन त्यांना आपण काय शिकवणार आहोत याकडे लक्ष दिले पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. शिक्षकांनी वर्गाला कसे शिकवावे व पर्यायाने वर्गाला कसे आकर्षून घ्यावे याचे धडे ते शिक्षकांना देत असत. प्रसंगी शिक्षकांना उपदेशही करत असत. शिक्षकांनी पूर्वतयारीनिशी वर्गात जावे, जीव ओतून विद्यार्थ्यांना शिकवावे, अवघड विषय सोपा करुन सांगावा, विद्यार्थ्यांच्या पोटात शिरून त्यांना समजेल व त्या विषयाची गोडी लागेल असे शिकवावे. विशेषतः इतिहासासारखे विषय त्या त्या भूमिकेत जाऊन शिकवाचे अशा मताचे ते होते.

शाळेत शिक्षकांचा पगार मेहेंदळे स्केलप्रमाणे आहे असे ते म्हणत. म्हणजे काय तर शिक्षकांना जेवढा पगार ठरलेला असे, 'तेवढा व्यवस्थित दिला जात असे, त्यात कोणतीही कपात केली जात नसे. ह्याचा अर्थ हा असायचा की शिक्षकांकडून ज्या दर्जाच्या कामाची अपेक्षा केली जाई, त्याप्रमाणे त्यांना मोबदलाही दिला जात असे आणि पगारसुध्दा दर महिन्याला नियमित दिला जात असे. शिक्षक आपापले विषय वर्गात शिकवून पूर्ण करतात की नाही, तसेच विद्यार्थ्यांकडून परीक्षेची तयारी नीट करून घेतली जात आहे ना ह्याची खातरजमाही केली जात असे.

मुख्याध्यापक म्हणजे आपल्या खोलीत काम करणारे अशी एक छबी असते, पण मेहेंदळे गुरुजी

ह्याच्या बरोबर उलट होते. ते आपल्या म्हणजे मुख्याध्यापकांच्या खोलीत क्वचितच दिसत. सतत शाळेत फेरफटका मारत असत. त्यामुळे प्रत्येक वर्गात कसे शिकवले जाते आहे, ह्याकडे आपोआपच त्यांचे बारकाईने लक्ष राहत असे. म्हणूनच सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना त्यांचा एक प्रकारचा धाक होता, वेळच्या वेळी परीक्षा घेणे, त्यांचे निकाल वेळेवर तयार करून त्यांच्या नोंदी प्रगतिपुस्तकांत करणे ह्या गोष्टींचेही काटेकोर पालन केले जात असे.

फक्त विद्यार्थ्यांनीच नाही, तर शिक्षकांनीही व्यवस्थित वागावे असा त्यांचा कटाक्ष होता. शिक्षकांनी शाळेत उशिरा आलेले, तसेच वर्गात झोपलेले त्यांना अजिबात खपत नसे. ह्याबद्दलचा एक किस्सा सांगितला जातो की, एक शिक्षक शाळेत उशिरा आले. त्या शिक्षकाला गुरुजींनी झापले व सांगितले की 'जो शिक्षक शाळेत वेळेवर येऊ शकत नाही तो विद्यार्थी कसे घडवणार? अश्या शिक्षकाला आमच्या शाळेत स्थान नाही. त्यामुळे तुम्ही उद्यापासून शाळेत न येणे चांगले ! तुमचा आत्तापर्यंतचा पगार तुम्ही शाळेच्या ऑफिसमधून त्वरित घेऊन शाळा सोडावी.'

कोणतीही सरकारी ग्रँट न घेता स्वतःच्या हिंमतीवर शाळा भरभराटीस आणणा-या शाळा अतिशय दुर्मीळ आहेत. हरिहर विद्यालय त्यांपैकीच एक ! मेहेंदळे सरांच्या अविरत कष्टाने शाळेला उर्जितावस्था प्राप्त झाली व ती आदर्श शाळा म्हणून ओळखली जाऊ लागली. शिस्त व गुणवत्ता ही शाळेची खासियत व परंपरा बनली, मेहेंदळे गुरुजींचा नावलौकिक ऐकून दूरदूरवरून लोक आपल्या मुलांना ह्या शाळेत पाठवू लागले. यात राजघराण्यातील कारभाऱ्यांची मुले, प्रतिष्ठित व्यक्तींची मुले होती. समाजातील गरीब-श्रीमंत, लहान-मोठे अशा सगळ्यांच्या मुलांना ह्या शाळेमध्ये समान वागणूक मिळत असे. गुरुजींनी काटकसर करून मेहनतीच्या जोरावर शाळेला उर्जितावस्था प्राप्त करून दिली. शाळेत ना क्लार्क नेमला, ना शिपाई. तसेच कधीही कसली वर्गणी काढली नाही. प्रसंगी जादा तास घेतले, पण त्याची जादा फी कधीच घेतली नाही. ह्यामुळेच शाळेला राजा व लोकाश्रय मिळाला. याचबरोबर शाळेची शिस्त कडक होती. शिस्त मोडली तर विद्यार्थ्यांना छडीचा मार मिळत असे. पण पालक त्याची कोणाकडे तक्रार करत नव्हते. कारण एकतर पालकांचा गुरुजींवर व त्यांनी केलेल्या शिक्षेवर (ती नक्कीच अकारण नसणार ह्यावर) गाढा विश्वास होता आणि शिस्त मोडल्याचे समर्थन त्या काळी कोणीच पालक करत नसत. त्यात मेहेंदळे गुरुजींच्या समोर तर नाहीच नाही. ह्या अशा शिस्तीमुळे कित्येक विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यात यशाची शिखरे पादाक्रांत केली. मुलांनी शाळेत वेळेवरच आले पाहिजे असा दंडकच होता. शाळा ११ वाजता भरत असे. ११ वाजल्यानंतर शाळेचा मुख्य दरवाजा बंद केला जात असे व दिंडी दरवाजा उघडा ठेवून त्या दरवाजातून उशिरा येणाऱ्या सर्वांना छडीचा प्रसाद देऊनच आत प्रवेश दिला जात असे. आणि विशेष म्हणजे ह्यात फक्त विद्यार्थीच नव्हे, तर प्रसंगी शिक्षकांनासुध्दा छड्या खाव्या लागत असत. दुसरी गोष्ट अशी होती की उशीर म्हणजे उशीर मग तो फक्त दोन मिनिटे असला तरी त्याला शिक्षा एकच असे. शाळा भरायच्या वेळेला ते स्वतः उभे राहून विद्यार्थ्यांचे निरीक्षण करत. मुलांनी स्वतःचे नीट आवरले आहे का? म्हणजे आंघोळ केली आहे ना? भांग नीट पाडला आहे ना? ह्याचे ते बारकाईने निरीक्षण करत असत. शाळेच्या वेळेत विशेषतः पी.टी. च्या तासाला किंवा एखादा तास ऑफ असेल तर त्या तासाला विद्यार्थ्यांनी दंगा करू नये अशी त्यांची अपेक्षा असे. त्यांच्या सायकलचा आवाज आला किंवा पायातील चप्पलेचा करकर आवाज आला तर लगेच सगळी शाळा चिडीचूप होत असे.

खेड्यातील विद्यार्थ्यांसाठी तसेच दूरवरून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गुरुकुल पध्दतीचे निवासस्थान शाळेत होते. तेथील विद्यार्थ्यांवर गुरुजींचे विशेष लक्ष असे. गुरुजी त्यांची शैक्षणिक प्रगती करवून घेत. ज्यांच्या घरी अभ्यासाला जागा नसे, त्यांच्यासाठी गुरुजींनी अभ्यासाला बसण्याची सोय शाळेत केली होती. विद्यार्थ्यांनी त्यांचे अथरुण-पांघरुण घेऊन संध्याकाळी ७ वाजता शाळेत यायचे. ७ ते ९.३० पर्यंत मुलांनी आपापला अभ्यास करावचा व काही शंका असल्यास मार्गदर्शनासाठी शिक्षकही तिथे उपलब्ध असत. रात्री ९.३० वाजता झोपायचे व पहाटे ५.३० वाजता उठायचे, सर्वप्रथम व्यायाम म्हणून शाळेभोवती

एक राउंड मारायचा व दीड तास अभ्यास करुन सकाळी ७.३० वाजता घरी जायचे. असा दिनक्रम त्यांना नेमून दिला होता.

वार्षिक परीक्षेच्या आधी २ महिने कच्च्या विद्यार्थ्यांचे रात्रीचे विशेष वर्ग सुरू केले जात. अशा विद्यार्थ्यांकडून रात्री २ तास व पुन्हा पहाटे २ तास अभ्यास करून घेतला जात असे. त्यामुळे विद्यार्थी नापास व्हायचे प्रमाण अगदी कमी होते. त्यामुळेही शाळेचा नावलौकिक वाढण्यास मदत झाली.

शिष्यवृत्ती परीक्षेकरिता विशेष तयारी व मार्गदर्शन केले जात असे. त्यामुळेच शिष्यवृतीच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत येणाऱ्या १५ पैकी १० ते १२ विद्यार्थी हरिहर विद्यालयाचे असत. याची जाहिरात मेहेंदळे गुरुजी शिष्यवृती परिक्षेत विद्यार्थी ढिगाने पास अशी करत, शाळा चालू असताना गुरुजी कोणत्याही वर्गात अचानक जात. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारताना विद्यार्थ्यांचे हजेरी नंबर पुकारत. त्या विद्यार्थ्याने उत्तर द्यावे ते अचूक द्यावे असे अपेक्षित होते. हरिहर विद्यालयात आपला पाल्य शिकत आहे ही पालकांच्या दृष्टीने एक अभिमानाची गोष्ट होती. ह्याबद्दलचा एक किस्सा सांगितला जातो की एका शिक्षकाने एक विद्यार्थी नापास झाला तरी त्याला वरच्या वर्गात चढवले. ही बाब पालकांना कळली, तेव्हा त्या पालकाने आपल्या पाल्याला त्याच वर्गात ठेवा व जेव्हा तो पास होईल तेव्हाच वरच्या वर्गात घाला असा आग्रह धरला. याचा अर्थ असाही होतो की पालकांच्यातही शाळेची शिस्त भिनली होती. इंग्रजी शासन असले तरीसुध्दा त्या काळात इतरत्र कुठेही न आढळणारे विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढेल असे विविध उपक्रम त्यांनी हाती घेतले.

दरवर्षी मकर संक्रातींपासून १ महिना पहाटेचे क्लास घेतले जात. पहाटेच्या क्लाससाठी विद्यार्थ्यांची राहण्याची सोय शाळेतच केली जाई. आंघोळीच्या पाण्यासाठी एक आडही होता, पण एकंदरीत आंघोळ ही गार पाण्यानेच करावी लागे. त्यामुळेच विद्यार्थ्यांना गार पाण्याच्या आंघोळीची आपोआप सवय होत असे. आंघोळीच्या आधी तोंड धुण्यासाठी राखुंडीचा डबाही ठेवलेला असे, पाठांतराने स्मरणशक्ती वाढते म्हणून त्यांनी पाठांतरावर भर दिला. रामरक्षा, मनाचे श्लोक फक्त विद्यार्थ्यांना म्हणायला न लावता विद्यार्थ्यांबरोबर ते स्वतःही म्हणत. सावरकराचे आत्मचरित्र माझी जन्मठेप पहाटेच्या वर्गात आवर्जून वाचून दाखवले जाई.

पहाटे ५ ते ६ या वेळेत शिक्षक मुलांना टेंबलाई, रेल्वे स्टेशन, नवीन राजवाडा, कोटितीर्थ, रंकाळा इ. ठिकाणे दाखवण्यासाठी घेऊन जात असत. ही ठिकाणे विद्यार्थ्यांना बघायला मिळाल्यामुळे त्याची माहिती मुलांना व्हायची. चालत फिरल्याने व्यायामही व्हायचा. सकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत गुरुजी स्वतः व्यावहारिक ज्ञानाचा तास घेतः यामध्ये बँकेचे व्यवहार, पोस्टाचे व्यवहार, समाजातील रोजचे इतर विविध व्यवहार यांची माहिती दिली जात असे.

डायरी लिहिणे हा दत्तोपंत मेहेंदळ्यांचा आवडीचा विषय. मेहेंदळे गुरुजींनी वयाच्या २३ व्या वर्षी लिहिलेली डायरी त्यांच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वाचून दाखवली. त्याचा परिणाम असा झाला की विद्यार्थ्यांनी त्यावेळेपासून डायरी लिहिण्याची शपथ घेतली. त्यांचा सुविचार 'रिकामा वेळ खिसा रिकामा करतो' हा कायमस्वरूपी तंतोतंत लागू पडतो. अशा डायऱ्या म्हणजे विद्यार्थ्यांच्या यशाचा पाया असतो. डायरी-लेखनाची सुरुवात 'श्री दत्त' हा शब्द लिहून ते करत. दैनंदिन व्यायाम, पोहणे, फिरणे, अभ्यास, सामाजिक कामे, घरातील कामे, त्याचबरोबर सुविचार व म्हणी यांचाही समावेश त्यात असे. उन्हाळी सुट्टीत, दिवाळीच्या सुट्टीत डायरी लिहावी याबद्दल ते आग्रही असत. ते स्वतः विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या डायऱ्याही तपासत.

निरोगी शरीर व मन या आवश्यक गोष्टी आहेत म्हणून ते दरवर्षी डॉक्टरांकडून विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी करून घेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना वैद्यकीय सहाय्य व उपचार मोफत मिळत विद्यार्थ्यांकडून कवायती करून घेण्यासाठी त्यांनी मिलिटरीतील निवृत अधिकारी नेमला होता. श्री. मुल्ला त्यांच्या मार्गदर्शनाखाली कवायती बरोबरच लेझीम, लाठीकाठी, दांडपट्टा यांचेही प्रशिक्षण दिले जाई.

मुलांना शालेय शिक्षणाबरोबरच इतरही शिक्षण दिले जात असे. विद्यार्थ्यांना आठवड्यातून २ दिवस टेक्निकल स्कूलमध्ये पाठवून सुतारकाम, लोहारकाम

इ. प्रकारच्या व्यावसायिक शिक्षणाचे घडेही दिले जात असत. अश्या प्रकारे विद्यार्थ्यांना औद्योगिक व व्यावसायिक प्रगतीचा मार्ग दाखवला जात असे. त्याचबरोबर मुलांना सुसरबागेत शेतीचेही प्रशिक्षण दिले जात असे. एकंदरच काय तर विद्यार्थी कुणाच्याही मदतीशिवाय स्वतःच्या पायावर उभा राहील असे शिक्षण देण्याची व्यवस्था मेहेंदळे गुरुजींनी केली होती. हा शिक्षणाशिवाय १ दिवस वादविवाद, एक दिवस गायनाचा क्लास घेतला जात असे, वादविवाद स्पर्धेत प्रत्येक विद्यार्थ्यांला सहभागाची सक्ती असे.

त्या काळात मुलकी (व्हर्नाक्युलर फायनल) परीक्षेचे महत्व फार होते. ह्या परीक्षेचे वर्गही घेतले जात असत. द.रा. मेहेंदळे गुरुजींना गायनाची फार आवड होती. त्यांचा आवाज फार चांगला नव्हता, पण तंबोरा वाजवायला त्यांना फार आवडत असे. शाळेत गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जात असे. उत्सवादरम्यान सजावट करणे, विविध गुणदर्शन जसे की गाणी म्हणणे, नकला करणे इ. सादर केले जात असे.

मेहेंदळे गुरुजींचे प्रत्येक विद्यार्थ्यांवर बारीक लक्ष असे. कोणता विद्यार्थी हुशार आहे, त्याचचरोबर कोणता विद्यार्थी उनाड आहे, तो कुठेकुठे जातो म्हणजे तो हॉटेलात जातो का? तो सिनेमाला जातो का? यावरही त्यांची बारीक नजर असे. त्याचबरोबर ते विद्यार्थ्यांच्या चांगल्या गोष्टींचे कौतुकही करत व त्याला मनापासून दाद देत. एखाद्या विद्यार्थ्यांचा लेख, कविता, दैनंदिनी इ. त्यांना आवडले तर शाळेत सर्वांना वाचून दाखवत, तसेच चांगले हस्ताक्षर असलेले हस्तलिखित, चांगले चित्र शाळेच्या चौकात सर्व विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी, बघण्यासाठी लावले जाई. त्यातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी हा त्यामागचा हेतू होता. दरवर्षी शाळेची सहल आयोजित केली जात असे. या सहलीकरिता काही वर्गणी असे. काही विद्यार्थी ही वर्गणी भरू शकत नसत. त्यातल्या ३ गरीब व हुशार विद्यार्थ्यांची सहलीची वर्गणी शाळा भरत असे. मेहेंदळे गुरुजींच्या काळात शाळा ९ वी पर्यंत होती, पुढील शिक्षणासाठी अन्य शाळेत जावे लागे. शाळा सोडताना फी पूर्ण असल्याशिवाय शाळा सोडल्याचा दाखला दिला जात नसे. मात्र मेहेंदळे गुरुजींच्या शाळेत हा नियम फक्त जे विद्यार्थी फी भरू शकत होते, अशांकरता होता असेच म्हणावे लागेल, कारण ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती नाही त्यांनी फी पूर्ण भरली नसली तरी त्यांना शाळा सोडल्याचा दाखला विनाविलंब दिला जात असे.

दरवर्षी ९ जानेवारीला शाळेचा वर्धापनदिन साजरा केला जात असे. ह्या दिवशी शाळेचे आजी-माजी विद्यार्थी, त्यांचे पालकांना आमंत्रित करून त्या सर्वांना हरभरा डाळीची कोशिंबीर व उसाचा रस देण्यात येत असे.

मी हरिहर विद्यालयाचा विद्यार्थी (मग आजी असो वा माजी आहे ही विद्यार्थ्यांना अभिमानाची गोष्ट वाटत असे. आजच्या काळात सांगायचे झाले तर हरिहर विद्यालय हा ब्रँड म्हणून नावारूपास आला. ह्या शाळेतून तयार झालेले विद्यार्थी त्यांच्या क्षेत्रात नावारूपाला आले. सामाजिक, राजकीय कला, साहित्य व शैक्षणिक ह्या क्षेत्रांत शाळेच्या ह्या माजी विद्यार्थ्यांनी नाव कमावले. हरिहर विद्यालय या शाळेने देशभक्त कलाकार, शास्त्रज्ञ, लेखक निर्माण केले. त्यामध्ये वसंत हुजूरबाजार, मोरेश्वर हुजूरबाजार (या दोघांनी पायथागोरसच्या सिद्धांताच्या सिद्धतेच्या दोन पध्दतींचा शोध लावला), वसंतराव गोवारीकर (मान्सूनच्या प्रमाणामागच्या अल निनोसारख्या नऊ घटकांची कारणमीमांसा, अतिरिक्त लोकसंख्येचे फायदे-तोटे वगैरे विश्लेषण), अभिनेते चंद्रकांत, सूर्यकांत, अभिनेत्री आशा काळे, लेखक दिलीप चित्रे या महान व्यक्तींच्या ज्ञानाचा पाया मेहेंदळे गुरुजींनी घातला. त्यांच्यामुळेच संस्थेचा आणि मेहेंदळे गुरुजींच्या नावाचा झेंडा सातासमुद्रापार फडकला.

हरिहर विद्यालयाच्या माध्यमातून शिक्षक, विद्यार्थी सर्व एका छत्राखाली आले. ते एक कुटुंब बनून गेले. सर्व कुटुंबाचे महानायक होते दत्तोपंत मेहेंदळे. २६ जानेवारी १९७२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यानंतर शाळेची धुरा केशवराव मेहेंदळे आणि कुटुंबियांनी समर्थपणे सांभाळली. मेहेंदळे एज्युकेशन सोसायटी आजही दत्तात्रय रामचंद्र मेहेंदळे यांचा आदर्श घेऊन शैक्षणिक कार्य करत आहे.

**- डॉ. विकास मेहेंदळे,** मोबा. ९१३६६५६२१३

# संक्रांत हळदीकुंकू समारंभ





रविवार,ता.२ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत चित्पावन संघाच्या कार्यालयात संक्रांत हळदीकुंकू समारंभ झाला. या कार्यक्रमात सर्व भिशी सभासद अत्यंत उत्साहाने सहभागी झाल्या. संक्रांत वाण म्हणून स्टील ग्लास देण्यात आले. सौ.वैदेही जोशी यांनी मकर संक्रांत या विषयावर प्रश्नमंजुषा घेतली. विजेत्यांना बक्षीसही देण्यात आले. कार्यक्रमासाठी ४५ भिशी महिला सभासद उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन सौ.पल्लवी देशमुख, सौ.आशा देशमुख, सौ.पूर्णिमा कुंटे, सौ.पंकजा गोरे यांनी केले.



# अर्थसाक्षरता जाणून घ्या !

कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने वय २५ ते ४५ या वयोगटातील व्यावसायिक, नोकरदार, तरुण–तरुणींसाठी अर्थसाक्षरता विषयक सीए. गौतम पद्माकर नाईक हे मार्गदर्शन करणार आहेत.

**अर्थसाक्षरता समजून घ्या Mr. X च्या चार्टमधून !**

१) आर्थिक नियोजन हा विषय तसा नवीन नाही... पण त्याचे प्रात्यक्षिक कधी बघितले आहे काय ?

२) उत्पन्न, खर्च आणि गुंतवणूक यामध्ये एक परस्पर संबंध आहे... आर्थिक निर्णय याचा विचार करून घ्यायचे असतात... हा विचार आपण कधी केला आहे काय ?

३) प्रत्येक व्यक्तीचा आर्थिक पॅटर्न वेगळा असतो... त्याचा अभ्यास करून आर्थिक निर्णय घ्यायचे असतात... असा विचार कधी केला आहे काय ?...

४) उत्तम आरोग्याबरोबरच जवळ पुरेसा पैसा असणे पण गरजेचे आहे... आपण सर्वजण पैसे मिळवतो... पण नेमके किती पैसे मिळवणे गरजेचे आहे याचा विचार कधी केला आहे काय ?

५) जसे आपण प्रिव्हेंटिव्ह हेल्थ चेक अप प्लॅन करतो तसाच फायनान्शिअल चेकअप पण करून घेणे गरजेचे आहे... हे कधी करून बघितले आहे काय ?

६) केवळ हौस म्हणून, कमी व्याजदरात कर्ज मिळते म्हणून खरेदी केलेला एखादा फ्लॅट किंवा महाडी गाडी काही वर्षांनंतर आपल्या कुटुंबास आर्थिक संकट तर देणार नाही ना ?

७) सध्याच्या माझ्या कुटुंबाच्या उत्पन्नावरून मी अजून काय काय इनव्हेस्टमेंट करू शकेन किंवा माझा रिटायरमेंट प्लॅन कधी असू शकेल.

या सगळ्या गोष्टींचा उहापोह Mr. X च्या चार्टच्या माध्यमातून समजावून घेऊया. सदरचा कार्यक्रम हा कोणत्याही स्कीमच्या मार्केटींगच्या उद्देशाने नसून सभासदांना केवळ आर्थिक साक्षरतेबद्दल जागृत करणे हा आहे.

**स्थळ : कोल्हापूर चित्पावन संघ कार्यालय, तुळजाभवानी संकुल, मोतीबाग तालीम, कोल्हापूर येथे**

**वेळ : शनिवार, दि. ८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६ वा.**

या कार्यक्रमासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे.
त्यासाठी संघाच्या मोबा. क्र. ७६२०५४६२२५ तसेच फोन क्र. ०२३१–२५४६२२५ वर नोंदणी करावी. प्रवेश मर्यादित.

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.